सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३३७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राज्यसभेचे पाचही उमेदवार विजयी

**पाटणा :** बिहारमध्ये राज्यसभेच्या निवडणुकीत एनडीएच्या पाच उमेदवारांचा दणदणीत विजय झाला आहे. विधानसभेनंतर राज्यसभेच्या निवडणुकीतही विरोधकांचा पराभव झाला आहे. बिहारमधील रिक्त झालेल्या पाच राज्यसभेच्या जागांसाठी एनडीएने बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल युनायटेडचे (जेडीयू) प्रमुख नितीश कुमार आणि भारतीय जनता पक्षाचे (भाजप) राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह केंद्रीय मंत्री रामनाथ ठाकूर, राष्ट्रीय लोक मोर्चाचे (आरएलएम) प्रमुख उपेंद्र कुशवाह (दोघेही सध्याचे राज्यसभा सदस्य) आणि भाजपचे शिवेश कुमार यांना उमेदवारी दिली होती. हे सर्वजण जिंकले आहेत.

## भाजपचे १४४ उमेदवार जाहीर

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने १४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. शुभेंदू अधिकारी यांना नंदीग्राम आणि भवानीपूर येथून उमेदवारी देण्यात आली आहे. परितोष दास यांना अलिद्वारपूर येथून तिकीट देण्यात आले आहे.भारत निवडणूक आयोगाने रविवारी संध्याकाळी पत्रकार परिषद घेऊन पश्चिम बंगालसह देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. हा कार्यक्रम जाहीर करून एक दिवस पण झाला नाही तोच भाजपची १४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली आहे. यावरून भाजपच्या पश्चिम बंगालसाठीच्या तयारीचा अंदाज येत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. यंदा पश्चिम बंगालमध्ये विधानसभेसाठी दोन टप्प्यात मतदान होणार आहे.

# महाराष्ट्र देशाचे आर्थिक पॉवर हाऊस आणि 'स्टार्टअप कॅपिटल', गुंतवणुकीसाठी उत्तम राज्य

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १६ मार्च :** महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त परकीय गुंतवणूक असलेले राज्य आहे. हे देशाचे आर्थिक पॉवर हाऊस असून देशाची 'स्टार्टअप कॅपिटल' आहे. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी उत्कृष्ट परिसंस्था असलेले राज्य आहे. त्यामुळे राज्यात ब्रिटनमधील गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मंत्रालयात ब्रिटनमधील बर्मिंगहॅमचे खासदार लियाम बर्न यांच्या नेतृत्वात खासदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली.



शिष्टमंडळाशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले, राज्याने 'वन ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र हे देशाचे टेक्नॉलॉजी हब असून देशाच्या एकूण सकल घरेलू उत्पादनात राज्याचा तेरा टक्के वाटा आहे. देशात डेटा सेंटरची साठ टक्के कॅपॅसिटी ही महाराष्ट्रात आहे. आपण ब्रिटनचे खरे राजदूत असून आपल्या शिष्टमंडळाची भेट राज्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारत आणि ब्रिटनमध्ये व्यापक आर्थिक आणि व्यापार करार झालेला आहे. हा करार महाराष्ट्र आणि ब्रिटनसाठी मैलाचा दगड ठरणारा असून कराराच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि ब्रिटनमध्येही व्यापार वृद्धिंगत होईल. राज्याच्या प्रत्येक भागात उत्पादन क्षेत्रामध्ये मोठी गुंतवणूक येत आहे. राज्यात २०३० पर्यंत एकूण ऊर्जा गरजेपैकी ५२ टक्के ऊर्जा ही नवीनीकरणीय क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण करण्याच्या ध्येयपूर्तीसाठी शासन काम करीत आहे. केंद्र शासनाने नवीन शिक्षण पद्धतीनुसार देशात विदेशी विद्यापीठांना परवानगी दिली आहे त्यानुसार महाराष्ट्र नवी मुंबई परिसरात एज्युसिटी उभारत आहे. यामध्ये विदेशी विद्यापीठांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एज्यूसिटीमध्ये शैक्षणिक दालने उघडण्यासाठी ब्रिटनमधील विद्यापीठांना ' लेटर ऑफ इंटेंट' देण्यात आले आहेत. या वर्षापासून ही विद्यापीठे अभ्यासक्रमही सुरू करीत आहेत. येथे एक लाख विद्यार्थी शिक्षण घेतील, अशी व्यवस्था करण्यात येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

ब्रिटनमधील लंडन आणि मुंबई ही शहरे आर्थिक विकासाची क्षमता लक्षात घेता साम्य असणारी आहेत. मुंबईत जागतिक फायनान्शियल सेंटर स्थापन करण्यात येणार आहे. तसेच ऑटोमोबाईल उद्योग क्षेत्रात पुणे आणि बर्मिंगहॅम शहरात साम्य असून या उद्योगांना दोन्ही शहरात समान संधी आहेत. गुंतवणुकीसाठी निर्माण केलेल्या परिसंस्थेचा उपयोग करीत ब्रिटनमधील गुंतवणूकदारांना राज्यात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी आहेत. महाराष्ट्र आणि ब्रिटनमधील भागीदारी निश्चितच उज्वल भविष्यासाठी लाभकारी ठरेल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी शिष्टमंडळाचे प्रमुख खासदार लियाम बर्न यांनी महाराष्ट्र हे केवळ देशाचे पॉवर हाऊस नाही तर, जगाचे गुंतवणूकदारांचे आकर्षण बनले असल्याचे गौरवोद्गार काढले. बैठकीत मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बळगण, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी , गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी शिष्टमंडळाला माहिती दिली. तसेच ब्रिटनमधील ब्रिटनचे भारतातील उच्चायुक्तामधील उपायुक्त हरजिंदर कांग, शिष्टमंडळातील जस्टिन मेडर्स, एलिसन ग्रिफिट्स, सोनिया कुमार, जॉन कूपर, सराह एडवर्ड्स, जोशुआ रेनॉल्ड्स यांनी आपली मते मांडली. बैठकीचे संचलन मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे यांनी केले.

## उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त पुण्यातून धावणार ३३४ उन्हाळी विशेष ट्रेन

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६ मार्च :** परीक्षा संपली की वेध लागतात ते सुट्टीचे, बाहेरगावी फिरायला जायचे, त्यामुळे उन्हाळ्यात रेल्वेवर प्रवाशांचा बोजा मोठ्या प्रमाणात वाढतो, हाच बोजा कमी करण्यासाठी आणि प्रवाश्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी पुणे रेल्वे विभागाने एक आनंदाची बातमी प्रवाशांना दिली आहे.

या विशेष गाड्यांमध्ये पुणे ते दानापूर मार्गावरील दैनिक विशेष गाडीच्या सर्वाधिक २१२ फेऱ्यांचा समावेश आहे. गाडी क्रमांक ०१४४९ ही विशेष गाडी १ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दररोज पुणे येथून सुटणार आहे. तर गाडी क्रमांक ०१४५० ही गाडी ३ एप्रिल ते १७ जुलै या कालावधीत दररोज दानापूर येथून पुण्याकडे धावणार आहे.

याशिवाय पुणे ते नागपूर दरम्यान साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाड्यांचेही नियोजन करण्यात आले आहे. या मार्गावर एकूण ५३ फेऱ्या होणार आहेत. गाडी क्रमांक ०१४६९ ही गाडी २१ एप्रिल ते १४ जुलै दरम्यान प्रत्येक मंगळवारी पुणे येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०१४७० ही गाडी २२ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दर बुधवारी नागपूर येथून धावणार आहे.

त्याचबरोबर पुणे ते नागपूर मार्गावर आणखी एका विशेष गाडीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०१४५७ ही १५ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दर बुधवारी पुणे येथून सुटणार असून गाडी क्रमांक ०१४५८ ही १६ एप्रिल ते १६ जुलै दरम्यान दर गुरुवारी नागपूरहून धावणार आहे. या गाडीच्या एकूण २८ फेऱ्या नियोजित करण्यात आल्या आहेत.



पुणे ते गाझीपूर सिटी दरम्यान द्विसाप्ताहिक विशेष गाडीही चालवली जाणार आहे. या मार्गावर एकूण आठ फेऱ्या असतील. गाडी क्रमांक ०१४३१ ही गाडी १७ ते २८ एप्रिल दरम्यान मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी पुणे येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०१४३२ ही गाडी १९ ते ३० एप्रिल दरम्यान रविवार आणि गुरुवारी गाझीपूर सिटी येथून धावणार आहे.

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये उत्तर भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असते. त्यामुळे या अतिरिक्त गाड्यांमुळे प्रवाशांना आरक्षण मिळणे सोपे होईल तसेच रेल्वेतील गर्दी कमी करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा रेल्वे प्रशासनाने व्यक्त केली आहे.



# थोडक्यात...

## एण्ड टीव्ही मालिकांमध्ये ड्रामा-कॉमेडीचा ट्विस्ट

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' आणि 'भाबीजी घर पर है २.०' मालिकांमध्ये आगामी भागांमध्ये ड्रामा आणि विनोदाचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे. घरवाली पेडवालीमध्ये सावी (सीरत कपूर) जीतूचे (पारस अरोरा) प्रेम मिळवण्यासाठी गरोदर असल्याचे खोटे नाटक करते. जीतू तिची काळजी घेऊ लागल्याने लतिका (प्रियमवदा कांत) अस्वस्थ होते. मात्र सावीची योजना जीतूच्या लक्षात येताच कथानकाला नवे वळण मिळते. दुसरीकडे भाबीजी घर पर हैमध्ये विभुती (आसिफ शेख) स्वीटू बनून अंगूरीला (शिल्पा शिंदे) फसवण्याचा प्रयत्न करतो. संशय वाढल्यानंतर अंगूरी सत्य शोधण्याचा निर्णय घेते, ज्यामुळे मालिकेत हास्याची धमाल रंगते.

## झी कुटुंब अ‍ॅवॉर्ड्समध्ये क्रिस्टल डिसूझाचे खास सादरीकरण

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'झी कुटुंब अ‍ॅवॉर्ड्स २०२६' सोहळ्यात अभिनेत्री क्रिस्टल डिसूझाने सहा वर्षांनंतर दमदार पुनरागमन करत रंगतदार सादरीकरण केले. वेद, देव, शिवाय आणि सिद्धू या कलाकारांसह तिने मंच गाजवला. आपल्या धुरंधर चित्रपटातील 'तेनू शरारत सिखावा जदो नैंना लडावा' या गाण्यावर तिने पहिल्यांदाच दूरदर्शनवर परफॉर्म केले. यावेळी झी टीव्हीशी असलेले आपले नाते कायम विशेष असल्याची भावना तिने व्यक्त केली. ओटीटी आणि चित्रपटांमध्ये व्यस्त असतानाही टेलिव्हिजनवर परत येणे नेहमीच खास वाटते, असेही ती म्हणाली. 'झी कुटुंब अ‍ॅवॉर्ड्स २०२६' हा सोहळा २२ मार्च रोजी झी टीव्हीवर प्रसारित होणार आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेसोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने त्यांच्या व्यावसायिक वाहन पोर्टफोलिओमध्ये वित्तपुरवठा सेवा प्रबळ करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेसोबत (एमजीबी) सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केल्याची घोषणा केली, जेथे एस प्रो सह त्यांच्या स्मॉल कमर्शियल वेईकल्स व पिक-अप्स (एससीव्हीपीयू) श्रेणीवर मुख्यत्वे लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा सहयोग ग्राहकांसाठी वेईकल खरेदी करणे सोपे करेल, जेथे कमी व्याजदर, सोपी कागदपत्रव्यवहार प्रक्रिया आणि त्वरित कर्ज वितरण अशा सेवा देईल. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे ७४८ शाखांचे व्यापक नेटवर्क महत्त्वाकांक्षी उद्योजक, ट्रान्सपोर्टर्स आणि पहिल्यांदा वेईकल खरेदी करणाऱ्या ग्राहकांना किफायतशीर ईएमआय उपलब्ध करून देईल, ज्यासह त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करून विकसित करण्यास मदत होईल.

## डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर ठरवेल नेतृत्व - जयकुमार रावल, मंत्री, महाराष्ट्र शासन

छत्रपती संभाजीनगर - भारताच्या डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरविषयक महत्त्वाकांक्षांना सीआयआय डेटासेंटर ब्लूप्रिंट समिट २०२६ च्या ७व्या आवृत्तीत विशेष अधोरेखित करण्यात आले. या परिषदेत वरिष्ठ सरकारी नेते आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी भारताला एआय-आधारित डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी महत्त्वाकांक्षी रोडमॅप मांडला. चर्चेत कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), क्लाऊड तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वेगवान विस्तारामुळे निर्माण होणाऱ्या संधींवर भर देण्यात आला, तसेच डेटा सेंटर्स, शाश्र्वत ऊर्जा आणि उच्च-गती कनेक्टिव्हिटीमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज अधोरेखित करण्यात आली.

## जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्सने ट्रेडमार्क उल्लंघनकर्त्यांविरुद्धमनाई हुकूम मिळवला

मुंबई : जेएसडब्ल्यू स्टीलची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि भारतातील आघाडीच्या स्टील उत्पादकांपैकी एक असलेल्या जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेडने, आपल्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्या अनेक कंपन्यांविरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या (व्यावसायिक विभाग) कडून दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी यशस्वीरित्या एकतर्फी अंतरिम मनाई हुकूम मिळवला आहे. हा मनाई हुकूम रामलाल लखाजी देवासी, मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स आणि मेसर्स चामुंडा स्टीलचे मालक; हितेश देवासी, मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्सचे मालक; बागदराम लखारामजी देवासी, मेसर्स चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंटचे मालक यांच्याविरुद्ध देण्यात आला आहे. हे सर्व महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्याच्या लासलगाव आणि मनमाड परिसरातून कार्यरत आहेत.

## व्यावसायिक वाहनांसाठी इको अश्युअर

पुणे : भारतातील अग्रगण्य खाजगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड) कंपनीने आज व्यावसायिक वाहनांसाठी इको श्युअर हे नवीन ड-ऑन कव्हर लाँच केल्याची घोषणा केली. हे नवीन कव्हर व्यावसायिक वाहन मालकांना दुरुस्तीचा खर्च अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. तसेच, त्यांच्या वाहनांची कमीत कमी व्यत्ययासह सतत कार्यरत राहण्याची खात्री करण्यासाठीही हे उपयुक्त ठरेल.

## एनएआर-इंडियाने वार्षिक कार्यक्रम आयोजित केला

पुणे : देशातील रिअल इस्टेट क्षेत्रातील व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी प्रमुख संस्था एनएआर-इंडिया यावर्षी मुंबईमध्ये आपला वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करणार आहे. या कार्यक्रमात रिअल इस्टेट इकोसिस्टमशी संबंधित प्रमुख भागधारक एकत्र येणार आहेत. या आयोजनातून सुमारे ३००० कोटींच्या व्यावसायिक व्यवहारांची अपेक्षा आहे, ज्यामध्ये रिलायन्स, टाटा आणि बिर्ला समूहासह देशातील प्रमुख राष्ट्रीय रिटेल ब्रँड्सचा सहभाग असणार आहे.

# उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेची नव्या काळातील मार्केटिंग रणनीती : लक्ष्मण वेलायुथम

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १६ मार्च :** लक्ष्मण वेलायुथम, प्रमुख - मुख्य विपणन अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक यांच्या मते वाढत्या गोंधळलेल्या आर्थिक परिस्थितीत, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक एका स्पष्ट तत्वाभोवती आपली मार्केटिंग रणनीती मांडत आहे - मोठ्या प्रमाणात प्रासंगिकता प्रदान करणे. तरुण आणि वाढत्या ब्रँडसाठी, याचा अर्थ असा आहे की ग्राहकांच्या जीवनात अनाहूत किंवा सामान्य न बनता अर्थपूर्णपणे उपस्थित राहणे.

या धोरणाच्या गाभ्यामध्ये एआयचे बुद्धिमान एकत्रीकरण आहे - एक गूढ शब्द म्हणून नाही, तर तीक्ष्ण निर्णय आणि जलद चपळतेचे सक्षमकर्ता म्हणून. बँक मानवी निर्णयक्षमता वाढविण्यासाठी आणि चपळता सुधारण्यासाठी मार्केटिंग इकोसिस्टममध्ये एआय एकत्रित करत आहे. हे डेटा विश्र्लेषण आणि सामाजिक ऐकण्याद्वारे तीक्ष्ण ग्राहक अंतर्दृष्टीने सुरू होते, ज्यामुळे त्यांना अधिक विचारशील संवादाची माहिती देणारे नमुने ओळखण्यास मदत होते. उल्लेखनीय म्हणजे, एआयने प्रयोगांसाठी नवीन शक्यता देखील उघडल्या आहेत, विशेषतः बँकिंग संभाषणांना दैनंदिन जीवनशैली वर्तनांशी जोडण्यासाठी. उदाहरणार्थ, अलिकडच्या बचत खाते मोहिमेने जीवनशैली आणि सौंदर्य संकेतांवर आधारित आर्थिक उत्पादनांभोवती अधिक संबंधित आणि मानवी कथा तयार केली.बँकेचे मीडिया मिश्रण तिच्या संतुलित सहभागाच्या तत्वज्ञानाचे प्रतिबिंबित करते.

सध्या डिजिटल कंपनीच्या एकूण मार्केटिंग खर्चात डिजिटल कंपनीचा वाटा १०% पेक्षा जास्त आहे आणि तो वाढतच आहे, परंतु ती जमिनीवर आणि समुदायावर आधारित मजबूत उपक्रमांसह एकत्रितपणे काम करते. हायपरलोकल सहभाग तिच्या धोरणात केंद्रस्थानी आहे. गणेशोत्सवादरम्यान, बँकेने सखोल अनुनाद निर्माण करण्यासाठी एआय-नेतृत्वाखालील प्रिंट आणि जमिनीवर आधारित उपक्रमांचा वापर केला.

ओडिशामध्ये, बँकेने ओडिशामध्ये रथयात्रेदरम्यान रथ ओढण्याचा एक अवास्तव अनुभव देण्यासाठी न्यूरोसायन्स तंत्रज्ञानाचा वापर केला. ग्राहकांशी भावनिकदृष्ट्या, परस्परसंवादी आणि तल्लीन अनुभवाद्वारे जोडणे ही कल्पना आहे. गोंधळलेल्या परिसंस्थेत, जिथे आवाज सामान्य झाला आहे, तेथे संबंधित आणि नाविन्यपूर्ण राहणे अत्यावश्यक आहे.

सक्रिय गुंतवणूक टप्प्यात एक तरुण ब्रँड म्हणून, उज्जीवनने ऐतिहासिकदृष्ट्या



समुदायांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी बिलो द लाईन आणि हायपरलोकल उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. पुढे जाऊन, ते पारंपारिक आणि डिजिटल चॅनेलच्या संयोजनाद्वारे ब्रँड-बिल्डिंग प्रयत्नांना बळकट करण्यासाठी त्याचे मिश्रण पुन्हा कॅलिब्रेट करत आहे. हेतू स्पष्ट आहे: उज्जीवनची व्याख्या करणारी हायपरलोकल संवेदनशीलता न गमावता एक मजबूत, अधिक सुसंगत ब्रँड उपस्थिती निर्माण करणे. क्रिएटर पार्टनरशिप ही तिच्या आउटरीच स्ट्रॅटेजीचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. तथापि, बँक शुद्ध पोहोचापेक्षा प्रासंगिकता आणि विश्र्वासार्हतेवर लक्ष केंद्रित करून प्रभावशाली मार्केटिंगकडे जाते. विविध प्रादेशिक क्रिएटर्ससोबतच्या सहकार्यामुळे स्थानिक सांस्कृतिक आणि भाषिक जागांमध्ये आर्थिक संभाषणे वाढविण्यास मदत झाली आहे. या भागीदारींचे उद्दिष्ट वित्तपुरवठा अशा स्वरूपांमध्ये आणि स्वरांमध्ये करणे आहे जे प्रामाणिक वाटतील, विशेषतः लहान शहरांमधील उदयोन्मुख डिजिटल प्रेक्षकांमध्ये. यांचा समावेश आहे.

# एमजीएममध्ये आयओटी विषयावर पाच दिवसीय कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १६ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' विषयावरील पाच दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आयओटी तंत्रज्ञानाचे सैद्धांतिक तसेच प्रायोगिक प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळेच्या उद्घाटन सोहळ्यास अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या संचालिका डॉ. शर्वरी तामणे, प्रा.करण दाभाडे तसेच प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने



उपस्थित होते.

कार्यशाळेसाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीचे प्रकल्प अभियंता मयूर नरवडे आणि ऋत्विक दोरके यांनी संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. या पाच दिवसांच्या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना आयओटीची मूलभूत संकल्पना, सेन्सर्स, कनेक्टिव्हिटी, डेटा प्रोसेसिंग, मायक्रोकंट्रोलर्स, तसेच युजर इंटरफेस यांसारख्या घटकांची सविस्तर माहिती देण्यात आली. यासोबतच प्रत्यक्ष हाताळणी सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना विविध आयओटी मॉडेल्स आणि प्रकल्पांची ओळख करून देण्यात आली.

यावेळी बोलताना संचालिका डॉ.शर्वरी तामणे म्हणाल्या, इंटरनेट ऑफ थिंग्ज म्हणजे सेन्सर्स, सॉफ्टवेअर आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून परस्पर जोडलेली भौतिक उपकरणांची एक स्मार्ट प्रणाली होय. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपकरणे डेटा गोळा करून त्याचे विश्र्लेषण करू शकतात आणि त्यानुसार स्वयंचलित पद्धतीने कार्य करू शकतात. घरगुती उपकरणांपासून ते औद्योगिक यंत्रणांपर्यंत विविध क्षेत्रांमध्ये आयओटीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असून भविष्यातील स्मार्ट तंत्रज्ञानाच्या विकासात त्याची महत्त्वाची भूमिका आहे.

# स्वस्त धान्य वितरकांडून साखरेचा काळा बाजार

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १६ मार्च :** पैठण शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानदार तीन महिन्यापासून अंत्योदय कार्ड धारकास प्रति एक किलो साखर देत नाही त्यामुळे पैठण शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानाची तपासणी करून पंचनामे अशी मागणी



एम.आय. एम पाक्षाचे शहराध्यक्ष निसार बागवान यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे केली आहे.

डिसेंबर २०२५ पासून शासनातर्फेत प्रत्येक अंतोदय कार्ड धारकास एक किलो साखर येत आहे आणि ती साखर स्वस्त धान्य दुकानदार अंतोदय कार्ड धारकाला न देता पैठण शहरातील सर्व दुकानदार त्या साखरेचा काळाबाजार करत आहेत. यासाठी पैठण शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानाची पाहणी करून त्यांचे पंचनामे करावेत. आणि ज्या तीन महिन्यापासून साखरेचा काळाबाजार पैठण शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानदार करत आहे, त्या स्वस्त धान्य दुकानावर कडक कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करावे.अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. कार्यवाही नाही झाल्यास एम.आय.एम पक्षाच्या वतीने पैठण तहसील कार्यालयावर मोठे जन आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती बागवान यांनी दिली.

# सोयगावच्या कुरुक्षेत्र करिअर अकॅडमीची विद्यार्थिनी कु. वैष्णवी ढगे हिचे दुहेरी यश



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १६ मार्च :** सोयगाव येथील कुरुक्षेत्र करिअर अकॅडमीच्या विद्यार्थिनीने दुहेरी यश संपादन करत संस्थेचा गौरव वाढवला आहे. अकॅडमीतील कु.वैष्णवी कडुबा ढगे हिने इस्रो सहल परीक्षेत पात्रता गुण मिळवून इस्रो सहलीसाठी आपली निवड निश्र्चित केली आहे.तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.याचबरोबर नुकत्याच जाहीर झालेल्या एन.एम.एस.परीक्षेतही कु.वैष्णवी ढगे हिने तालुक्यात सर्वप्रथम क्रमांकाचे गुण प्राप्त करून आणखी एक यश आपल्या नावावर नोंदवले आहे.त्यामुळे तिच्या या दुहेरी यशाबद्दल परिसरात आनंदाचे वातावरण आहे. या यशाबद्दल सचिन ढगे यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी सांगितले की,विद्यार्थ्यांनी जर मनापासून प्रयत्न केले तर ते काहीही साध्य करू शकतात.प्रयत्नांती परमेश्र्वर आहे.कु.वैष्णवी ढगे हिच्या या यशाबद्दल कुरुक्षेत्र करिअर अकॅडमीचे शिक्षक,पालक व विद्यार्थ्यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथे १९ मार्च रोजी 'विराट हिंदु-राष्ट्र जागृती सभा'

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १६ मार्च :** शहरातील पिसादेवी परिसरातील पळशी रोड, श्रीराम पेट्रोल पंपच्या पाठीमागे असलेल्या कै. द्रौपदाबाई नानाभाऊ काळे क्रीडा संकुल मैदानात गुरुवार, दि. १९ मार्च रोजी 'विराट हिंदु-राष्ट्र जागृती सभे'चे आयोजन हिंदु जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

या हिंदू-राष्ट्र जागृती सभेला भाग्यनगर येथील 'श्रीराम युवा सेने'चे संस्थापक-अध्यक्ष आमदार टी. राजा सिंह, सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव आणि हिंदु जनजागृती समितीची मराठवाडा संघटक, कु. प्रियांका लोणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सभेच्या निमित्ताने दि. १७ मार्चपासून सभास्थळी भव्य शिवकालीन शस्त्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात युद्धात वापरली जाणारी विविध शस्त्रे, शिवकालीन नाणी, त्या काळातील पत्रे व संदेश आदी ऐतिहासिक वस्तूंचे दर्शन घडणार असून उपस्थितांना शिवकालीन इतिहासाचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

या हिंदु-राष्ट्र जागृती सभेच्या प्रसारासाठी दि. १७ मार्च, मंगळवार, सायंकाळी ४ वाजता वाहनफेरी आयोजित करण्यात आली आहे. या वाहनफेरीची सुरुवात हरसिद्धीमाता मंदिर, हर्सूल येथून होऊन पिसादेवी मंदिर, पिसादेवी येथे समारोप होणार आहे.

या हिंदु-राष्ट्र जागृती सभेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या जिल्हा समन्वयक कु. प्रियांका लोणे यांनी केले आहे.

# भगवान महावीर जन्मकल्याण महोत्सवाची प्रथम बैठक जोहरीवाडा जैन मंदिरात उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १६ मार्च :** सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव दिनांक ३१ मार्च रोजी मोठया उत्साहाने साजरा करण्यात येणार असुन प्रथम बैठकीचे आयोजन आनंदजी कल्याणजी जैन श्श्र्वेतांबर मंदिर ट्रस्ट जोहरीवाडा येथे करण्यात आले. यावेळी भगवान महावीरांच्या फोटोला पुष्प व दिप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन संगीतरत्न संजय संचेती यांनी केले. या प्रसंगी अनिलमामा संचेती, अमोल पुर्णकर, कौशीक सुराणा, झुंबरलाल पगारीया, मुकेश साहुजी मिठालाल कांकरीया, प्रशांत देसरडा, संजय संचेती, रवि मुगदिया, मुन्ना चंडालिया, राहुल डोसी विलास साहुजी यांच्यासह जन्मकल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रतिक साहुजी, अजय सिंघवी, सारीका साहुजी, बाहुबली वायकोस, श्रेणीक कासलीवाल, पंकज साकला, हितेश कांकरीया, जी.एम.बोथरा, राजेश मुथा, स्वप्नील पारख, विनोद बोकडिया, विलास साहुजी, संजय संचेती, कविता अजमेरा, प्रतिभा सावलकर, मेघा सुगधी, करैणा साहुजी, स्वाती साहुजी आदी मान्यवरांच्या हस्ते भगवंताच्या फोटोला माल्यार्पन करैन दिप प्रज्वलन करण्यात आले. तसेच श्रेणीक कासलीवाल यांनी जन्मकल्याणक महामहोत्सवाची रैपरेषा सांगीतली.



यावेळी प्रतिक साहुजी यांनी सांगीतले की, रक्तदान शिबीर, अन्नदान, शैक्षणिक, परिवारीक आदी सामाजिक व धार्मिक कार्यकम होणार आहे. सकल जैन युवा मंडळाच्या वतीने जैन प्रिमीअर लिग किकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे रोहित छाजेड यांनी सांगीतले. तसेच वैदयकीय समितीचे प्रमुख डॉ.प्रकाश झांबड यांनी शहराच्या विविध भागात भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यासाठी सांगीतले. यावेळी उपाध्यक्ष विलास साहुजी यांनी सांगीतले माझे शहर माझी जवाबदारी ही टॅग लाईन बाबत घोषणा केली व तसेच विश्श्र्वामध्ये शांती राहो तसेच हर प्राणी सुखी राहो या कल्याणकारी भावनांसाठी संपुर्ण विश्श्र्वामध्ये नवकार फाउैंडोन व जैन जितो च्या तत्वाधानामध्ये नवकार महामंत्राचा जाप अनुष्ठाण होणार आहे असे रवि मुगदिया यांनी सांगीतले. जैन अलर्ट ग्रुपच्या माध्यमाने घाटीमध्ये अन्नदान व जैन एक्सो चे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकल महिला समितीच्या वतीने विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही सारीका साहुजी यांनी सांगीतले. तीन दिवशीय अर्हम योग साधना शिवीराचे आयोजन तसेच महिलांसाठी गृहउदयोग ज्या करतात त्यांच्यासाठी ट्रेड फेअर चे आयोजन सुध्दा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच नवकार फाउैंडेशन व सच्ची याय माता सेवक संघ यांच्या वतीने मां सच्चीयाय यांची विशाल भक्ती संध्या भजन सम्राट निलेश बाफना यांच्या वतीने २६ मार्च रोजी होणार असल्याचे सांगीतले.

यावेळी महेंद्र चंडालिया, डॉ.उमेश तातेड, जितु गादीया, राहुल डोसी, निता सेठीया, ममता जैन, शकुंतला जैन, मधुबाला जैन, संतोष पापडीवाल, प्रकाश कोचेटा,पियुष कासलीवाल हर्षेल साहुजी, सचिन क्षिरसागर प्रतिभा सावलकर, कविता संचेती, मेघा सुगंधी, करैणा साहुजी, सचिन क्षिरसागर, विजयकुमार वायकोस, शुभम घोडके, प्रशांत शहा, अविनाश गवळी, किशोर क्षिरसागर, जयश्री हुरवेकर, सारीका चंडालिया, राखी बोरा, मिना पापडीवाल, भावना सेठीया, सारीका साहुजी, प्रिया चोरडिया,रैपाली मुथा, कल्पना मेहता, लता क्षिरसागर, भाग्यश्री जैन, छाया गोसावी, स्वाती साहुजी, मंगल पारख, मंजु पाटणी, उज्वला सोनटक्के, यांच्यासह सकल जैन समाजाचे बांधव व महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सिल्लोड यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९१४ /२०२६

१) लुकमान मोहम्मद शरीफ, वय ७५ वर्ष, धंदा शेती, रा. सावळदबारा ता.सोयगाव,जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरूद्ध-

महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र (succession certificate) मिळणेसाठी ड.सचिन सुनिल गिरी रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.मयत अमिराबी मोहमद लुकमान यांचा मृत्यू दि.०१.०५.२०२२ मौजे सावळदबारा, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत अमिराबी मोहमद लुकमान यांचे वारस असुन त्यांना महाराष्ट्र ग्रामीण बैंक शाखा सावळदबारा,ता.सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे, मयत अमिराबी मोहमद लुकमान यांच्या खात्यावर असलेली १६,५८,३५५/- रुपये काढण्यासाठी वारस प्रमाणपत्राची (succession certificate) आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र (succession certificate) देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. २७/०२/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २७.०३.२०२६

क.लिपीक

(दिवाणी वरिष्ठन्यायालय,सिल्लोड)

अधीक्षक

(दिवाणी वरीष्ठन्यायालय,सिल्लोड)

प्रतिलीपी :

१)नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सिल्लोड..

२)ग्रामपंचायत सावळदबारा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ४७/२०२६

अर्जदार:-

१)धूपाबाई पुरंदास राठोड,वय.६६ वर्षे, धंदा, घरकाम,
२)काळु पुरंदास राठोड, वय, ३३ वर्षे, धंदा, शेती,
३)बाळु पुरंदास राठोड, यय, ३३ वर्षे, धंदा. शेती..
४)शांताराम पुरंदास राठोड, वय. ३१ वर्षे, धंदा, शेती, सर्व रा.ऊप्पलखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ५)संगिता भिला चव्हाण, वय, ५० वर्षे, धंदा, घरकाम, रा. मोरगांव, ता. जामनेर, जि. जळगांव.

गैरअर्जदार :- कोणीही नाही.

प्रकरण:- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी अ‍ॅड. वाय.आर.जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे.मयत पुरंदास गणपत राठोड हे दि. २१/०४/२०२२ रोजी मौजे. ऊप्पलखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत पुरंदास गणपत राठोड यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासून ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या केगिदपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- १८/०४/२०२६.

आज दि.१६/०३/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

**विभागीय लिपीक,**
**(दिवाणी न्यायालय,क.स्तर,सोयगांव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी न्यायालये,क.स्तर,सोयगांव)**

प्रत :

१)दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव नोटीस बोर्ड.
२)ग्राम पंचायत, ऊप्पलखेडा ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर..

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी शिवाजी भरोसे यांची निवड :

नेतृत्वाचे मानले आभार; शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही

**परभणी,दि.१६(प्रतिनिधी) :** परभणी महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवक पदासाठी शिवाजी शेषराव भरोसे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार व्यक्त केले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री मेघना बोर्डीकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे तसेच माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर आणि सुरेशराव वरपुडकर यांचे त्यांनी विशेष आभार मानले. दरम्यान, परभणी महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्याकडे भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी शेषराव भरोसे यांनी स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज सादर केला. यावेळी गटनेत्या तिरुमला खिल्लारे, मोकींद खिल्लारे, प्रवीण गायकवाड आदी उपस्थित होते. दरम्यान, पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत परभणी शहराच्या विकासासाठी कार्यरत राहणार असल्याचे भरोसे यांनी सांगितले.

### धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त बुधवारी शहरात मुकपदयात्रा : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा उपक्रम; शनिवार बाजार येथून सायंकाळी प्रारंभ

**परभणी,/प्रतिनिधी :** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३३७ व्या बलिदान दिनानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान परभणीच्या वतीने बुधवार १८ मार्च रोजी फाल्गुन अमावस्येच्या दिवशी शहरात मुकपदयात्रा काढण्यात येणार आहे.

मागील एक महिन्यापासून संपूर्ण जिल्ह्यात हजारो श्री शिव-शंभुपाईकांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान मासानिमित्त व्रत पालन केले असून नित्य आदरांजली अर्पण केली आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी फाल्गुन अमावस्येला ही मुकपदयात्रा आयोजित करण्यात आली आहे. शहरातील शनिवार बाजार येथून सायंकाळी ७.१५ वाजता मुकपदयात्रेला प्रारंभ होणार असून शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोरील शिवतीर्थ मैदान येथे पोहोचणार आहे. या ठिकाणी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांवर आधारित गीत, श्लोक व ध्येयमंत्र पठण करून मुकपदयात्रेचा समारोप करण्यात येणार आहे.

या मुकपदयात्रेत शहरातील सर्व श्री शिव-शंभुपाईक तसेच नागरिकांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, परभणीच्या वतीने करण्यात आले आहे.

### आयुर्वेद व्यासपीठ परभणीतर्फे आयोजित व्याख्यानात महिलांचे मानसिक आरोग्य व सायबर गुन्ह्यांबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**परभणी,/प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनानिमित्त आयुर्वेद व्यासपीठ परभणीच्या वतीने निरामय योग केंद्र, परभणी येथे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात संभाजीनगर येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. दिपाली देशमुख यांनी 'महिलांचे मानसिक आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केले. महिलांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव कसा हाताळावा, मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी ॲड. मंजुषा बागल यांनी 'सायबर क्राईम' या विषयावर मार्गदर्शन करत महिलांनी सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाची काळजी, ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी तसेच कायदेशीर उपाययोजना याबाबत माहिती दिली.

या कार्यक्रमाला परभणी शहरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयुर्वेद व्यासपीठ परभणीचे अध्यक्ष विनोद पत्की, उपाध्यक्ष विद्या भालेराव, सचिव गुरुदत्त चौधरी यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पारवे यांनी केले. यावेळी कुणाल कौसडीकर, स्वप्नजा कळमकर, सहसचिव पूजा बाहेती, स्मिता कुलकर्णी, मेघना मुंदडा तसेच इतर महिला सदस्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य केले.

### अपहरण प्रकरणातील आरोपी वाघोली येथे ताब्यात; स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** मागील वर्षी पाथरी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या अपहरण प्रकरणातील आरोपीला पुणे परिसरातील वाघोली येथे केलेल्या कारवाईत स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले.

पाथरी तालुक्यातील गुंज येथील आरोपी दीपक मधुकर धोत्रे याच्याविरुद्ध पाथरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४९४/२५ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तालुक्यातील कानपूर येथील १८ वर्षीय मुलीला पळवून नेल्याप्रकरणी हा गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सुरू असताना दोघेही पुणे परिसरातील वाघोली येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने कारवाई करत दोघांनाही ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी त्यांना पाथरी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हा शाखेचे विवेकानंद पाटील, गोपिका सुनीत, सुग्रीव केंद्रे, मधुकर चट्टे, निलेश भुजबळ, आम्रपाली हिंगलेकर आणि गुंगे यांच्या पथकाने केली.

दरम्यान, शहरातील नानलपेठ पोलीस ठाण्यात दोन वर्षांपूर्वी भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये दाखल असलेल्या प्रकरणातील पाहिजे असलेला आरोपी चंद्रमुनी रमेश चव्हाण यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शहरातील बसस्थानक परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत त्याला पकडण्यात आले. मागील दोन वर्षांपासून हा आरोपी पोलिसांना पाहिजे होता. सदर कारवाई स्थानिक गुन्हा शाखेचे विवेकानंद पाटील, गोपिका सोनेत, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ आणि उत्तम हनवते यांच्या पथकाने केली असून पुढील कारवाईसाठी आरोपीला नानलपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### डॉ. भीमराव हत्तीअंबिरे यांची अकोला ग्रामीण जिल्हा निरीक्षकपदी निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष तथा प्रवक्ते डॉ. भीमराव हत्तीअंबिरे यांची अकोला ग्रामीण जिल्हा निरीक्षकपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मान्यतेने ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे तसेच प्रदेश सरचिटणीस रोहित पवार यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार यांनी केली आहे.

# ..तर हलगर्जीपणा करणाऱ्या रुग्णालयांवर राज्य सरकार काय कारवाई करणार?

**गंगाखेड ,/प्रतिनिधी-** राज्यातील सर्वसामान्य जनतेला चांगले वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने विविध योजना सुरू केल्या आहेत. परंतु शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात काही रुग्णालयांकडून होत असलेल्या हलगर्जीपणामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे अशा रुग्णालयांवर नेमकी कोणती कारवाई झाली, किती रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आणि प्रलंबित तक्रारींचे काय होणार, यासारखे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करत स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे विधिमंडळात चांगलेच संतापले. तसेच त्यांनी आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकतेची मागणी केली.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी आणि नागरिकांच्या तक्रारींचा प्रश्न उपस्थित करत आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी सभागृहात संतप्त भूमिका मांडली. तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ प्रत्यक्ष रुग्णांपर्यंत पोहोचतो आहे का, की काही रुग्णालयांकडून त्याचा गैरवापर होत आहे, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. गरीब आणि गरजू रुग्णांना दिलासा देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणीच योग्य प्रकारे होत नसेल, तर त्या योजनांचा उद्देशच कसा साध्य होणार, याचाही सविस्तर खुलासा करण्याची आग्रही भूमिका आ.डॉ.गुट्टे यांनी मांडली. राज्यातील विविध खाजगी व शासकीय रुग्णालयांकडून शासनाच्या आरोग्य योजनांची अंमलबजावणी करण्यात होत असलेल्या त्रुटींविषयी आ.डॉ. गुट्टे यांनी काही मुलभूत प्रश्न उपस्थित केले. अशा योजनांची अंमलबजावणी करण्यात हयगय करणाऱ्या रुग्णालयांवर सरकारने नेमकी किती कारवाई केली आहे, किती रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे आणि त्याची जिल्हानिहाय आकडेवारी उपलब्ध आहे का, असाही सवाल आ.डॉ.गुट्टे सभागृहात मांडला. यासोबतच अकोला जिल्ह्यातील १२ प्रकरणांबाबतही त्यांनी विशेष लक्ष वेधले. या प्रकरणांमध्ये संबंधित खाजगी रुग्णालयांची संख्या किती आहे, त्यांच्यावर नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत स्पष्ट माहिती देण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली. तसेच राज्यभरात आरोग्य योजनांशी संबंधित एकूण २६६ तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आणून देत त्या प्रकरणांवर शासन नेमकी काय कारवाई करणार आहे, याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी शासनाने कोणती कालमर्यादा निश्चित केली आहे का, तसेच संबंधित रुग्णांना न्याय मिळण्यासाठी कोणती ठोस कार्यवाही करण्यात येणार आहे, याबाबतही डॉ. गुट्टे यांनी सभागृहात भूमिका मांडली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांमध्ये कोणत्याही प्रकारची दुर्लक्ष किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान, यावर उत्तर देताना शासनाच्या आरोग्य योजनांची अंमलबजावणी करताना नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कडक कारवाई केली जाईल. तसेच संबंधित रुग्णालयांविरुद्ध आवश्यक तेथे फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येतील आणि पीडित रुग्णांना न्याय मिळवून दिला जाईल, असेही आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर यांनी सांगितले. तरीही, या चर्चेमुळे राज्यातील आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीचा मुद्दा पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, नागरिकांच्या हितासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरजही स्पष्ट झाली.

**...म्हणून शासनाने एक हेल्पलाईन सुरू करावी! केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेच्या अंमलबजावणीबाबतही काही व्यावहारिक अडचणी येत आहेत. शासनाने या योजनेसाठी मोबाईल ॲप कार्यान्वित केले असले, तरी ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना ते ॲप व्यवस्थित वापरता येत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील नागरिकांना मदत होण्यासाठी तालुका किंवा जिल्हा पातळीवर विशेष हेल्पलाईन सुरू करण्याबाबत शासनाने सकारात्मक विचार करावा, अशीही सूचना आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे सभागृहात मांडली.**

### मंत्री मेघना बोर्डीकर यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**जिंतुर,/प्रतिनिधी-** राज्य मंत्री तसेच पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना



आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार अमेरिकेतील यू.एस. इंडिया एसएमई कौन्सिल या संस्थेतर्फे देण्यात येणार आहे.

हा पुरस्कार १४ मार्च रोजी जाहीर करण्यात आला असून, त्यांचा सत्कार २५ मार्च रोजी सकाळी १० वाजता नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.

मेघना बोर्डीकर यांनी महाराष्ट्रात, विशेषतः परभणी जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे, देदीप योजना, ग्रामीण महिलांसाठी सिल्क अँड मिल्क उपक्रम तसेच एकल महिला सशक्तीकरण अभियान यांसारख्या योजनांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर राज्यभरातून मेघना बोर्डीकर यांचे अभिनंदन होत आहे.

## ईठलापूर येथे पशुवैद्यक महाविद्यालयाचे रासेयो विशेष शिबिर संपन्न : ग्रामस्वच्छता, लसीकरण, जनजागृतीसह विविध उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी-** पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे (रासेयो) विशेष शिबिर ९ ते १५ मार्च या कालावधीत ईठलापूर येथे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रणेश येवतिकार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले. या शिबिरात महाविद्यालयातील एकूण ७२ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, ग्राम सर्वेक्षण, जनजागृती प्रभात फेरी, जनावरांचे लसीकरण व उपचार तसेच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे गावकऱ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि



पशुसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

शिबिराच्या समारोपीय दिवशी ईठलापूर येथे जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. समारोप कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. डी. एस. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करत समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा दिली.

या शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. के. के. खोसे यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. चीगुरे, डॉ. राठोड, डॉ. रिंढे, डॉ. लोढे, डॉ. वाघमारे आणि डॉ. रसाळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## अवकाळीच्या धास्तीने गहू काढणीची लगबग सुरू हवामान खात्याचा पाऊस, वारा व गारांचा इशारा

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** शासकीय हवामान वेधशाळा व हवामान अभ्यासक पंजाब डख यांच्या अंदाजानुसार मराठवाड्यात अवकाळी पाऊस, वारा व गारांचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा रब्बी गहू, ज्वारी व हरभरा काढणीला वेग आला असून अनेक शेतकरी अर्धवट हिरवा असलेला गहू कापून झाकून ठेवत आहेत. तर काहीजण तसाच मळणी यंत्रातून काढून घेत असल्याची लगबग सर्वत्र सोनपेठ तालुक्यात दिसून येत आहे.

गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे खरीपाची पिके जमीन उध्वस्त झाली. त्यानंतर सोनपेठ तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामामध्ये हरभरा ज्वारी व गहू या पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. लवकर पेरणी केलेले शेतकऱ्यांचा हरभरा व ज्वारीचे पीक काढून झाले असले तरी उशिराने पेरणी झालेल्या शेतकऱ्यांचा गहू, ज्वारी व हरभरा अजूनही शेतावरच उभा आहे. गेली आठवडाभरापासून हवामान अभ्यासक पंजाब व शासकीय हवामान वेध शाळेकडून दिनांक १७ ते २२ मार्च दरम्यान महाराष्ट्रासह मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस, सोसाट्याचा वारा येणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी गारा पडणार असल्याचेही भाकीत करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल काढण्याची एकच लगबग सुरू केली आहे. पावसाच्या धास्तीने ज्वारी हरभरा व गहू काढून झाकून ठेवण्यासाठी शेतकरी धडपडत असताना दिसून येत आहेत, तर काही ठिकाणी ज्वारी गहू व हरभरा या पिकांची काढणी करून त्याची मळणी करण्यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. अशातच अनेकांना वेळेत मळणी यंत्र व मजूर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे.

अवकाळीच्या धास्तीने मळणीचे भाव वाढले

अवकाळी पाऊस येणार असल्याने, हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेऊ नये यासाठी जो तो शेतकरी धडपडताना दिसत आहे. यावेळी काढलेल्या पिकांची मळणी करण्यासाठी मळणी यंत्रासाठी धावाधाव सुरू असून मळणी यंत्र चालकांनी आपले भाव वाढविले आहेत. एक कट्टा गहू काढण्यासाठी १०० ते १५० रुपये, ज्वारी साठी १०० ते १५० रुपये तर हरभरा मळणी साठी १५० रुपये दराने पैसे घेतले जात आहेत. एवढे पैसे देऊनही वेळेत मळणी यंत्र मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची मळणी यंत्राच्या शोधार्थ धावपळ सुरू आहे.

मजुरांचेही भाव वाढले

रब्बीचे ज्वारी, गहू, हरभरा पीक काढण्यासाठी मजुरांची टंचाई भासत असून तालुक्यातील अनेक मजूर ऊस तोडणीसाठी इतरत्र साखर कारखान्याकडे गेलेले आहेत. ऊस तोडणीच्या टोळ्या गावाकडे परतल्या नसल्यामुळे ठिकठिकाणी मजुरांची टंचाई भासत आहे. अशातच गहू काढण्यासाठी प्रति एक्कर २ ते ३ कट्टे (६० किलो प्रती कट्टा),एक एक्कर ज्वारी काढण्यासाठी दोन ते आडीच कट्टा ज्वारी, एक एक्कर हारभरा काढणीसाठी ४००० रुपये याप्रमाणे मजुरी द्यावी लागत आहे. एवढे देऊनही वेळेत मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे. अवकाळी पाऊस येणार आहे या धास्तीने शेतमजुरांचे व मळणी यंत्र चालकांचे भाव दीडपट ते दुप्पट वाढले आहेत. तालुक्यातील कमी शेत जमीन असलेले लहान शेतकरी हे स्वतः घरच्या घरी पीक काढण्यासाठी आहेत.

## जिंतूर नगर परिषद कार्यालय येथे उपाध्यक्ष यांचे कक्षाचे उद्घाटन



**जिंतूर,/प्रतिनिधी:** नगरपरिषद निवडणुकीत सलग पाच वेळा निवडून येण्याचा मान प्रभाग १२ जिंतुर चे उमेदवार पठाण मैमुन्नीसा फयाजखा यांनी मिळविला असून माजी आ. रामप्रसाद बोर्डीकर यांच्या आदेशाने व माननीय नामदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर पालकमंत्री परभणी व युवा नेते गंगाधरराव कदम बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद गट नेते सचिन उर्फ मुन्ना गोरे यांच्या प्रयत्नाने नगर परिषद उपाध्यक्षपदी पठाण मैमुन्नीसा बेगम फैयाजखान यांची सर्वानुमते निवड झाली

दि. १६ मार्च रोजी नगरपरिषद कार्यालय जिंतुर येथे उपाध्यक्ष यांच्या कक्षाचे उद्घाटन नगरीचे नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख गटनेते मुन्ना गोरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मुख्याधिकारी नगर परिषद उमेश ढाकणे, नगरसेवक गोपाळ रोकडे, डॉ दुर्गादास कान्हळकर, हाजी म. अथर, दत्ता कटारे, प्रदीप चौधरी, फेरोज पठाण,प्रदीप चव्हाण, याहिया बेग,किशोर जाधव, आसेफ पठाण,मुन्ना कुरेशी,राजा वैष्णव, कासाबाई बुधवंत, शेख शकील पत्रकार, टीकाखान पठाण, मोसीन पठाण, बाबाखान पठाण, सिराज सिद्दीकी पत्रकार, खुशालराव घुगे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विक्रमी गाळप साध्य करण्याचा मानस -चेअरमन भावना मुंगसे

**जिंतूर,/प्रतिनिधी:** टोकाइ सहकारी साखर कारखान्याचे आगामी गळीत हंगामाचे उदिष्ट विक्रमी करण्याचा मानस चेअरमन भावना ताई मुंगसे यांनी व्यक्त केला.

भावनाताई मुंगसे यांच्या भक्कम नेतृत्वात श्री तुळजाभवानी शूगर प्रा. ली.सहयोगी तत्वावर चालवत असलेल्या टोकाई सहकारी साखर कारखान्याच्या सर्व सभासदांच्या ऊस बिलाची रक्कम खात्यावर जमा केली.

सर्व सुजान शेतकरी,सभासद सन्माननीय संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू असून पुढील गाळप हंगामात पूर्वीपेक्षा विक्रमी गाळप साध्य करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मत भावनाताई मुंगसे यांनी व्यक्त केले.

कारखाना हे एक आपले घर असून उत्पादक सभासद, संचालक कर्मचारी तसेच ऊस वाहतूकदार हे सर्व कारखान्याच्या कुटुंबातील सदस्य आहेत. सहकारी तत्त्वावर कोणताही व्यवसाय हा चालवत असताना एकमेकांना साथ देणे व एकमेकांना विश्वासात घेऊन पुढे वाटचाल करणे ही तत्त्वे पाळणे फार मोलाची असतात ''बिना सहकार नही उद्धार'' या म्हणीप्रमाणे एकमेकांवर विश्वास ठेवून एकमेकांना सहकार्य करून आपण निरंतर आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवू शकतो.

पण दुर्दैवाने काही सन्माननीय संचालक बांधव



ऊस उत्पादक शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे जाणवले याचे अतिव दुःख झाल्याचे मत व्यक्त करत या बद्दल तीव्र नाराजी भावनाताई मुंगसे यांनी यावेळी व्यक्त केली.

कोणत्याही सहकारी साखर कारखान्याचा ऊस उत्पादक शेतकरी हा कणा असतो. शेतकरी बांधवांचा विश्वास संपादन करूनच पुढील यशस्वी वाटचाल



करावी लागते. ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या विश्वासाने कारखान्यावर ऊस आणतो व आपलं भविष्य ठरवतो पण ते हा अशा कोणत्याही अफ

काही संचालक मंडळ त्यांची दिशाभूल करत असल्याने निदर्शनास आलेले आहे.

वर ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी विश्वास ठेवू नये. अशी भावना भावना ताई मुंगसे यांनी व्यक्त केली.

## अग्रलेख...

# युद्ध आणि विरोधकांची भूमिका

जग सध्या मोठ्या ऊर्जा संकटातून जात आहे. गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा वापर आता शस्त्रासारखा होऊ लागला आहे. रशिया-युक्रेन युद्ध भरात असताना अमेरिका आणि मध्य पूर्वेतील तेल उत्पादक देशांनी त्या परिस्थितीचा फायदा उचलत कच्च्या तेलाचे दर वाढवीत भरपूर नफा कमाविला. अशा परिस्थितीत रशिया भारताच्या मदतीला आला. अमेरिकेच्या दबावाला न जुमानता रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करीत आपले ऊर्जा साठे आणखी मजबूत केले. रशिया-युक्रेन युद्ध लांबत असल्याने डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार शुल्काचा दंडुका हातात घेतला आणि रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्याची धमकी दिली. याचा जो परिणाम व्हायचा तो झालाच. भारताने एका झटक्यात रशियाकडून तेल आयात थांबविली नाही, पण त्यात मोठी कपात केली. स्वस्तात मिळणारे कच्चे तेल बंद झाले. इराणवरही आर्थिक निर्बंध असल्याने तेथूनही कच्चे तेल आयात करणे थांबले. वास्तविक पाहता इराणकडून कच्चे तेल आयात करणे भारताला आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. पण, ट्रम्प यांच्या हेकेखोर वृत्तीचा फटका भारताला बसला. तेहरानपासून सुरू झालेले युद्ध आता समुद्रांमध्ये पोहोचले आहे. आशियाई देशांना होर्मुझ सामुद्रधुनीतून कच्चे तेल आणि वायूचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होतो. पण, होर्मुझमध्ये सध्या शेकडो मालवाहू जहाजे अडकली आहेत. तेल घेऊन येणारी जहाजे अडकल्याने पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. तेलाचे दरही प्रती बॅरेल १०० डॉलर्सच्या वर गेले आहेत. भारतात अद्याप पेट्रोल-डिझेलचे दर वाढले नसले तरी युद्ध लांबल्यास परिस्थिती बिकट होऊ शकते. कच्च्या तेलाच्या किमती वाढत असल्याने पेट्रोलियम कंपन्यांचा तोटा वाढतो. पाठोपाठ चलनवाढ होऊन महागाई वाढते. म्हणूनच स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात सरकारला नाईलाजाने वाढ करावी लागली. तशी ही सामान्य परिस्थिती आहे. आपल्या पुरवठा साखळीशी संबंधित असलेल्या भागांत युद्ध सुरू झाल्यानंतर वस्तूंचा तुटवडा निर्माण झाल्याने किमती वाढणे अस्वाभाविक नाही. अशाप्रसंगी सरकार कुणाचे हे महत्त्वाचे नाही. २१ व्या शतकातील तिसरे दशक जगासाठी जणू संकटे घेऊन आले, असेच म्हणावे लागेल. भारताला तर एका वेळी अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे.

कोरोनाच्या महामारीने जगात हाहाकार उडविला होता. लक्षावधी नागरिकांचा कोरोनाने बळी घेतला. जागतिक अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली होती. अनेक देश देशोधडीला लागले. अशा आर्थिक संकटाच्या काळात रालोआ सरकारने परिस्थिती कुशलतेने हाताळली, असेच म्हणावे लागेल. कोरोनातून सावरत असतानाच २०२३ पासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाले. त्यात इस्रायल-हमासची भर पडली. त्याचा परिणाम हळूहळू का होईना, पण झालाच. भारत युक्रेनकडून सूर्यफूल बिया मोठ्या प्रमाणात आयात करतो. सोबतच उच्च दर्जाच्या मक्यालाही मागणी होती. पण, गेली चार वर्षे युद्ध सुरू असल्याने व्यापार विस्कळीत झाला. तेलाच्या किमती गगनाला भिडू लागल्या. पर्यायी मार्ग शोधल्याने कमोडिटी मार्केट स्थिरस्थावर होत असतानाच डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आले. त्यांनी टॅरिफ वॉर सुरू करून जगाला पुन्हा संकटात टाकले. भारतावर ५० टक्के व्यापार शुल्क आकारले. भारताला याचा मोठा फटका बसला. अमेरिकेत होणारी काही वस्तूंची निर्यात घटली. तब्बल सहा महिने अशीच परिस्थिती राहिली आणि अखेर दोन्ही देशांत व्यापार करार झाला. व्यापार शुल्क ५० वरून १८ टक्क्यांवर आले. या व्यापार कराराची दोन्ही बाजूंनी अधिकृत घोषणा आणि अंमलबजावणीही झालेली नसताना इराण-इस्रायल-अमेरिका युद्ध भडकले. जगात पुन्हा अस्थैर्य निर्माण झाले. इंधन आणि वायू पुरवठा विस्कळीत झाला. पंधरा दिवस लोटून आणि दोन्ही बाजूंचे मोठे जीवित आणि आर्थिक नुकसान होऊनही संघर्ष थांबण्याची चिन्हे नाहीत. उलट, संघर्षाची नवी केंद्रे निर्माण होत आहेत. तेहराननंतर युद्ध आता समुद्रात शिरले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत धुमश्चक्री सुरू झाली. वायू आणि कच्चे तेल हे खाडी देशांच्या श्रीमंतीचे गमक आहे. होर्मुझमधील अडथळे दूर करण्यासाठी अमेरिकेने इराणच्या खर्ग बेटावर हल्ला केला. या बेटावर इराणची सर्वांत मोठी रिफायनरी आहे. विशेष म्हणजे या बेटावरून चीनला इंधनाचा पुरवठा होतो. येथूनच इराणच्या ९० टक्के इंधनाची निर्यात होते. अमेरिकेने याच बेटावर असलेल्या लष्करी तळाला लक्ष्य केले. सध्या फक्त लष्करी तळांनाच लक्ष्य केले. इराण शरण न आल्यास तेलसाठे आणि रिफायनरीजवर हल्ले करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला.

चीन हा इराणसाठी कच्च्या तेलाचा सर्वांत मोठा आयातदार देश आहे. होर्मुझपेक्षा खर्ग बेटावरून चीनकडे दररोज अधिक मालवाहू जहाजे जात असतात. अमेरिकेची ही कारवाई एकप्रकारे चीनला दिलेला इशारा आहे. कारण, खामेनेई राजवटीच्या मागे चीन ठामपणे उभा आहे. इराणच्या लष्करी शक्तीबाबात इस्रायल आणि अमेरिकेने लावलेले अंदाज चुकीचे ठरत आहेत. पंधरा दिवस होऊनही आणि प्रचंड नुकसान झेलूनही इराण मागे हटायला तयार नाही. युद्ध केवळ शस्त्रास्त्रे आणि मनुष्यबळांची उपलब्धता यावर लढली जात नाहीत. ती इच्छाशक्तीच्या बळावर लढली आणि जिंकली जातात हे वारंवार सिद्ध झाले आहे. बलाढ्य सैन्यशक्ती असलेल्या अमेरिकेच्या तोंडाला इराणने सध्या फेस आणला आहे. इस्रायलच्या तर अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. इराणच्या स्वस्त, हलक्या आणि विध्वंसक ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांच्या माऱ्याने अमेरिकेचे मध्यपूर्वेतील लष्करी तळ नेस्तनाबूत झाले आहेत. युद्ध कोणत्या दिशेने जाईल याचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे. इराण लवकरच शरण येईल, ही डोनाल्ड ट्रम्प यांची अपेक्षा फोल ठरली. शेकडो सैनिक ठार झाले, प्रत्यक्ष सर्वोच्च नेते अली खामेनेई यांनाही गमावले. तरीही इराण अजूनही मैदानात पाय रोवून उभा आहे. या संघर्षात मध्यपूर्वेतील अनेक देश होरपळत आहेत. कतार, सौदी अरब, बहरीन, कुवैत, संयुक्त अरब अमिरात या देशांचे मोठे नुकसान झाले. वायू आणि कच्च्या तेलाची निर्यातच ठप्प झाल्याने व्यापारातील तोटा वाढला आहे. अशा कठीण प्रसंगातही भारत संयम ठेवून परिस्थिती हाताळत आहे. गॅसची कमतरता भासू नये म्हणून इराण आणि रशियासोबत बोलणी सुरू केली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत अडकलेल्या आणि एलपीजी घेऊन निघालेल्या दोन जहाजांना जाऊ देण्यास इराणने होकार दर्शविला आहे. एवढेच नव्हे तर भारताला त्रास होणार नाही, याची काळजी घेण्यात येणार असल्याचे इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले आहे. संकट डोक्यावर असतानाही युद्धग्रस्त देशांमधील जनता राज्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. भारतात मात्र उलटे चित्र दिसत आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्ष या युद्धाच्या आडून स्वतःचा राजकीय फायदा शोधत आहेत. देशात सिलेंडर आणि इंधनाचा साठा मुबलक असून, नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन सरकारने केलेले असतानाही काँग्रेस रस्त्यावर उतरून जनतेच्या मनात भीती निर्माण करण्याचे काम करीत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरविल्या जात आहेत. परिणामी मोठ्या प्रमाणात सिलेंडरची पॅनिक बुकिंग केली जात आहे. काँग्रेससह साऱ्या विरोधी पक्षांना विरोध करण्याचा अधिकार आहे. पण देशात अराजक निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणेही आवश्यक आहे. युद्ध किती काळ चालेल हे कुणालाही माहीत नाही. पण, जणू काही भारतामुळेच मध्यपूर्वेतील युद्ध भडकले, अशा पद्धतीने विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न चालविले आहेत. ठिकठिकाणी सरकारविरुद्ध काँग्रेसने रान उठविणे सुरू केले आहे. विरोध करणे हे त्यांचे काम असले तरी त्यामागे ठोस कारण असले पाहिजे. परिस्थिती निवळण्यास मदत करण्याऐवजी ती कशी चिघळेल, यासाठीच विरोधकांकडून प्रयत्न केले जात आहेत, जे चुकीचे आहे. संकटाच्या परिस्थितीत राजकीय नफा-तोट्याचे गणित बाजूला ठेवून सरकारच्या पाठीशी उभे राहण्याची भारतात आतापर्यंत पद्धत होती. ती पद्धत विरोधक विसरले असतील तर आता जनतेने शहाणे व्हायला हवे, एवढेच सध्या म्हणता येते. ▮

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# डॉलर-बॅरलचे युद्ध!

''राजकीय सत्ता ही बंदुकीच्या बॅरलमधून प्रवाहित होत असते.'' चीनचे नेते माओ त्से तुंग यांचे हे एक प्रसिद्ध विधान होते. अर्थात ते विसाव्या शतकातील होते. एकविसाच्या शतकात सत्तेचे माध्यम बदलले आहे. आता ही सत्ता कच्च्या तेलाचा बॅरल आणि अमेरिकन डॉलर यातून प्रवाहित होत आहे. आणि त्यावरील पकड मजबूत करण्यासाठी मध्यपूर्वेत युद्ध छेडले गेले आहे.

**दोनशे डॉलर?** : युद्ध आणखी काही काळ सुरू राहिल्यास तेलाच्या एका बॅरलसाठी २०० डॉलर मोजण्याची तयारी जगाने ठेवावी अशी भाषा इराणने उच्चारली आहे. आताच एका बॅरलने शंभर डॉलरची पातळी ओलांडली आहे तर दुसरीकडे एक डॉलर शंभर रुपयांचा होण्याची वाटचाल सुरू आहे. हा सारा परिणाम आहे- अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा. या युद्धाशी संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, टर्की, कुवैत, कतार या देशांचा काहीही संबंध नाही. पण, त्या देशांना या युद्धाचे परिणाम भोगावे लागत आहेत. तीच स्थिती भारताची झाली आहे. भारताचे इस्रायल व इराण या दोन्ही देशांची चांगले संबंध. पण, त्यांच्यातील युद्धाचा फटका भारताला, भारतीय जनतेला बसणे सुरू झाले आहे.

मध्यपूर्वेत सुरू झालेले हे युद्ध आणखी किती दिवस चालेल याची कल्पना करणे अवघड आहे. कारण, इस्रायल व अमेरिका या दोन्ही देशांची उद्दिष्ट्ये वेगवेगळी आहेत. इराणी नेते खामेनी यांना ठार करणे व इराणचा आण्विक कार्यक्रम उद्ध्वस्त करणे हे इस्रायलाचे मर्यादत उद्दिष्ट होते. ते युद्धाच्या पहिल्याच दिवशी साध्य झाले. त्यानंतर इस्रायलने हे युद्ध थांबवावयास हवे होते. पण, अमेरिकेमुळे इस्रायलला हे करता आलेले नाही.

**अमेरिकेचे उद्दिष्ट** : अमेरिकेला इराणमध्ये कठपुतली सरकार हवे आहे, जेणेकरून इराणच्या कच्च्या तेलावर अमेरिकेला आपला हक्क सांगता येईल. अमेरिकेचे हे उद्दिष्ट साध्य होणे जरा अवघड आहे. कारण, इराणच्या तेलावर चीनने आपला हक्क अगोदरच सांगितलेला आहे. इराणच्या एकूण तेल निर्यातीपैकी ८६ टक्के निर्यात एकट्या चीनला होते. आणि चीनच्या एकूण तेल आयातीत इराणचा वाटा सर्वांत मोठा आहे.

**चीन निश्चिंत** : इराणने आपली आपली हार्मुजची खाडी बंद केल्याने काही तेल उत्पादक देश चिंतित आहेत. इराणने काही तेलवाहक जहाजांना आगी लावल्या आहेत. या खाडीतून एक लिटर तेलही बाहेर जाणार नाही अशी घोषणा इराणने केली आहे. पर्शियन आखात आणि ओमानचे आखात यांना जोडणारी खाडी म्हणजे हार्मुजची खाडी. काही ठिकाणी ही खाडी एवढी उथळ आहे की मोठ्या तेलवाहक जहाजांना इराणच्या किनारपट्टीला लागूनच प्रवास करावा लागतो आणि तो सारा भाग इराणने बंद केला आहे. यात चीन असा एकमेव देश आहे की त्याच्यावर हार्मुज खाडी बंद झाल्याचा कोणताही परिणाम होणार नाही. कारण, चीनने इराणचे तेल आयात करण्यासाठी काही वर्षांपूर्वीच रेल्वे मार्ग बांधला आहे. इराणचे कच्चे तेल सागरीमार्गाने चीनच्या तेल शुद्धीकरण कारखान्यात पोहोचण्यास ४५ दिवस लागतात तर रेल्वेने हेच काम १५ दिवसांत पूर्ण केले जाते. १०,४०० किलोमीटर लांबीचा हा रेल्वेमार्ग २०२५ च्या जून महिन्यात पूर्ण करण्यात आला. तेहरानजवळील अप्रीन बंदर ते चीनमधील झियान यांना जोडणारा हा रेल्वेमार्ग चीनच्या महत्त्वाकांक्षी योजनेनुसार पूर्ण करण्यात आला. चीन यावरच थांबलेला नाही. त्याने आणखी एक पर्यायी रेल्वे मार्ग बांधण्याची योजना आखली आहे. पाच देशांना जोडणारा हा नवा रेल्वे मार्ग काहीसा जास्त वेळ घेणारा असला तरी तो पूर्ण करण्याचा चीनचा मनोदय आहे. याशिवाय चीन-इराण यांच्यात २५ वर्षांचा सुरक्षा करारही झाला आहे. म्हणजे वेळ पडल्यास चीन इराणच्या रक्षणासाठी



उघडपणे समोर येण्यास मागे-पुढे पाहणार नाही.

**खामेनींची निवड** : इराणने अयातुतोल्ला खामेनी यांचे पुत्र मोताबा खामेनी यांना उत्तराधिकारी निवडून अमेरिकेला एकप्रकारे आव्हान दिले आहे. सुरक्षेच्या कारणांसाठी ही निवड 'ऑनलाईन' करण्यात आली. ८८ पैकी ८० 'मतदारांनी' मोताबा खामेनींना पाठिंबा दिला. यात इराणच्या लष्कराची फार मोठी भूमिका होती. या निवडीला चीनचा आशीर्वाद असल्याचे सांगितले जाते. इराणच्या नव्या राजवटीमागे चीन व रशिया हे दोन्ही देश असल्याने अमेरिकेचे उद्दिष्ट कसे साध्य होणार हा एक मोठा प्रश्न आहे. आमच्या पाठिंब्याशिवाय इराणमध्ये नवा नेता निवडला जाऊ शकत नाही असे राष्ट्रपती ट्रम्प वारंवार सांगत असले तरी इराणने अगोदरच चीनचे मांडलिकत्व पत्करले आहे.

**तेल भडकले** : मध्यपूर्वेतील या युद्धाची किंमत आता साऱ्या जगाला मोजावी लागत आहे. ब्रेंट कच्चे तेल १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहे. याशिवाय आखाती देशांनी तेलाचे दररोजचे उत्पादन ८ मिलियन बॅरल म्हणजे ८० लाख बॅरलने घटविले आहे. जे तेल उत्पादित होते, ते हार्मुजची खाडी बंद असल्याने बाहेर पाठविणे अशक्य झाले आहे. याने साऱ्या जगभर हाहाकार होण्याची स्थिती तयार होत आहे. म्हणजे हे युद्ध लवकर न थांबल्यास एक वेगळ्या प्रकारचा 'लॉकडाऊन' जगात सुरू होईल.

**डॉलर-बॅरल** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी सत्ता हाती घेतल्यापासून ते सातत्याने डॉलरला मजबूत करण्याची भाषा बोलत आहेत. ब्रिक्स म्हणजे ब्राझील, रशिया, भारत, चीन हे देश युरोच्या धर्तीवर नवे चलन तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत असे ट्रम्प यांना वाटत होते. त्यात भारतही सामील असल्याचा त्यांना संशय होता. त्यातून त्यांचा भारतविरोधी पारा अधिक भडकत गेला. अमेरिका कोणत्याही परिस्थितीत डॉलर कमजोर होऊ देणार नाही असे प्रतिपादन ते करीत आले आहेत.

**विकासाचे इंजिन** : प्रत्येक देशाला आपल्या विकासासाठी लागणारे इंधन म्हणजे कच्चे तेल. या तेलावर कब्जा करावयाचा अशी महत्त्वाकांक्षा बाळगून ट्रम्प निर्णय घेत आहेत. रशियाचे खच्चीकरण करावयाचे असेल तर व्हेनेझुएलाच्या तेलावर ताबा मिळवावा लागेल या योजनेतून त्यांनी या देशाच्या राष्ट्रपतीलाच पळविले आणि आता ते तेथील नामधारी सरकारकडून कच्चे तेल मिळवीत आहेत.

इराण हा चीनच्या विकासाचे एक प्रकारचे इंजिन आहे असे ट्रम्प यांना वाटते. त्यांनी व्हेनेझुएलाची पुनरावृत्ती या देशात करण्याचा प्रयत्न चालविला आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याचे अपहरण करणे शक्य नसल्याने त्याची चक्क हत्याच करण्यात आली. आता इराणमध्ये सत्तापालट करण्याचा त्यांचा मनोदय आहे. ते कितपत साध्य होईल असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**जीपीएस विरुद्ध बीडीएस** : २०२५ च्या मे महिन्यात भारत- पाकिस्तान यांच्यात झडलेल्या संघर्षाची एका वेगळ्या प्रकारची पुनरावृत्ती या संघर्षात दिसत आहे. चार दिवसांच्या युद्धादरम्यान, चीन पाकिस्तानला भारताच्या लष्करी हालचालींचे 'लाईव्ह लोकेशन' पुरवीत होता आणि पाकिस्तान त्याआधारे आपले हल्ले चढवीत होता. अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धात हेच होत असल्याचे म्हटले जाते. इराण ज्या अचूकपणे अमेरिकन लष्करी तळांना व इस्रायली लष्करी केंद्रांना लक्ष्य बनवीत आहे ही सारी चीनची करामत असल्याचे मानले जाते. कुवैतमध्ये अमेरिकेची किमान तीन एफ-१५ विमाने इराणने पाडली. यामागे चीन होता असे आता मानले जाते.

अमेरिका-इस्रायल हे जीपीएस म्हणजे ग्राऊंड पोझिशनिंग सिस्टिमचा वापर करून इराणवर हल्ले चढवीत आहेत तर इराणने चीनच्या बीडीएस म्हणजे बायदू सिस्टिमचा वापर चालविला आहे. बहुतेक तज्ज्ञांच्या मते चीनची बायदू प्रणाली ही अमेरिकेच्या जीपीएसपेक्षा कितीतरी पटीने अचूक आहे. त्याचा प्रत्यय या युद्धात येत आहे. अगदी नेमक्या शब्दात सांगावायचे झाल्यास, अमेरिका व चीन यांच्यातील युद्ध मध्यपूर्वेच्या रणांगणात लढले जात आहे. ▮

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# वारसा परंपरेचा

अवघ्या दोन दिवसांनी चैत्र महिना सुरू होईल. गुढीपाडव्याची तयारी घरोघरी एव्हाना सुरू देखील झाली असेल. अर्थात, हे काम घरातील आई-वडील, आजी-आजोबाच सांभाळतात. गुढीसाठी काठी काढून धुतली जाईल, गुढीचे वस्त्र पाहून ठेवले जाईल. गाठी ठेवलेलीच असणार. या दिवशी मेन्यू काय करावा, त्यावरही आई-आजीची चर्चा सुरू असेल. गुढीची पूजा दरवर्षीप्रमाणे बाबाच करतील, आई नैवेद्य आणून ठेवेल, गुढीला हळदी-कुंकू वाहून नमस्कार करेल. तिचे औक्षण केले जाईल. संध्याकाळी सूर्यास्तापूर्वी बाबा ती गुढी व्यवस्थित खाली उतरवून ठेवतील आणि आई, बाबा, आजी, आजोबा गाठीचा आणि कडूलिंबाच्या पानांचा प्रसाद मोठ्या श्रद्धेने ग्रहण करतील. पण, हे काय, या संपूर्ण चित्रात नवीन पिढी कुठेच दिसत नाही. दुर्दैवाने ही वास्तविकता आहे की, आपल्या या पारंपरिक सणांमध्ये नवीन पिढीचा सहभाग फारच कमी आहे.



आज चाळीस-पन्नासच्या वयात असलेल्या मंडळींनी आपल्या लहानपणीचा गुढीपाडवा आठवून पाहावा. काठी शोधून ती धुऊन ठेवणे, गुढीची तयारी करणे, घरातील अन्य कामांत मदत करणे, गुढीची पूजा झाल्यानंतर तिला मनोभावे नमस्कार करणे, सायंकाळी गुढी उतरवल्यानंतर इच्छा नसली तरीही कडूलिंबाचा प्रसाद ग्रहण करणे असा सहभाग घरातील मुलांचा नक्कीच असायचा.

आताचे चित्र जरा वेगळे आहे. गुढीपाडवा असला तरी घरातील मुलगा किंवा मुलगी स्वतःच्या वेळेवरच झोपून उठणार, वर सांगितल्याप्रमाणे गुढीपाडव्याच्या एकूणच छोटेखानी समारंभात घरातील अपत्याची भूमिका अगदी पाहुणे कलाकारासारखीही नसते. याला दोषी ही नवीन पिढी नाही तर घरातील आई-वडील आणि मोठी मंडळी आहेत. कारण त्यांनी मुलांना आपल्या परंपरेचा वारसा योग्य पद्धतीने हस्तांतरित केलेलाच नाही.

हा आपला सण आहे आणि याचे महत्त्व काय आहे, हे नवीन पिढीला पटेल अशा पद्धतीने सांगण्यातच आलेले नाही. याआधीची पिढी धाकाने सर्वकाही करायची. पण, आताच्या पिढीला धाक कामाचा नाही. त्यांना विश्वासात घेऊन शांतपणे सारे काही समजावले पाहिजे. त्यांनी सणांसाठीची तयारी स्वतःहून, उत्साहाने करावी इतका जोश पालकांनीच त्यांच्यात भरला पाहिजे. हा आपला सण आहे आणि आजपासून आपले नवे वर्ष सुरू होत आहे. तुम्ही ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता नवीन वर्षाचा जल्लोष करता, पण आपला सण सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत असतो. तुम्ही जसे नवीन वर्षासाठी काहीतरी 'रिसोल्यूशन' ठेवता त्याच पद्धतीने आपण या कालावधीत आपण संकल्पाची गुढी उभारतो. सर्वांना सुखी, आरोग्यपूर्ण, संपन्न जीवन मिळावे, अशी कामना करतो. या दिवशी नवे कपडे घालायचे, गुढीला नमस्कार करून घरातील सर्व मोठ्यांचेही आशीर्वाद घ्यायचे. गोडा-धोडाचे जेवण करायचे आणि संपूर्ण दिवस कुटुंबासोबत आनंदाने घालवून सायंकाळी सूर्यास्तापूर्वी गुढीला नमस्कार करून खाली उतरवायचे. गुढीला बांधलेल्या कडूलिंब आणि गाठीच्या प्रसादाचेही अपार महत्त्व आहे. कडू-गोडाचा हा मिलाफ आयुष्याचे रंग दाखवतोच पण, त्या दिवशी खाल्लेला कडूलिंबाचा पाला आगामी काळातील व्याधींपासून रक्षण करतो.

अशा सर्व पद्धतीने नव्या पिढीला या सणाचे स्वरूप समजावले तर कदाचित ते पुढील वर्षी स्वतःहून याच्यासाठी सज्ज राहतील. त्यांना यातील आनंदाची जाणीव झाली तर ते त्यांच्या पिढीतील इतरांना आणि नंतर आपल्या मुलांनाही तो वारसा अलगद सोपवतील.

अजूनही वेळ गेलेली नाही. त्यामुळे घरातील मोठ्यांनी लहानांना गुढीपाडव्याच्या सणात सहभागी करून घेण्याची पूर्वतयारी करावी. घरातील काठी शोधण्यापेक्षाही आपल्या परंपरेचा आधार असणारी नव्या पिढीची काठी शोधणे जास्त गरजेचे आहे. गुढीच्या गाठीइतक्याच नात्यांतील गाठीत देखील गोडवा निर्माण होणे गरजेचे आहे आणि कडूलिंबाचा पाला खाण्याइतके हे काम कठीण वाटत असले तरी निरोगी समाजव्यवस्था तसेच कुटुंबव्यवस्थेसाठी हे जास्त गरजेचे आहे. हे काम घरातील मोठ्यांनी यशस्वीपणे पार पाडले तर यंदा गुढीपाडव्याला आपण नव्या पिढीला काहीतरी चांगला वारसा सोपवतोय, याचे समाधान नक्कीच मिळेल. ▮

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# संघ-युगाचा शालिवाहन

''उजाळीलेस तू तममय जीवन, संघ युगाचा शालिवाहन'' अशा पद्धतीचे संघामध्ये एक गीत आहे. ज्याप्रमाणे शकांचा पूर्णपणे पराभव करणारा शालिवाहन राजा याने भारतभूमीला संकटमुक्त केले, यासाठी त्याने मातीतून सैनिक निर्माण केले. मातीतून सैनिक निर्माण केले म्हणजे या वाक्याचे अनेक अर्थ असू शकतात. याच मातीत जन्मलेल्या लोकांतून त्यांनी सैनिक निर्माण केले, हा त्याचा एक अर्थ असू शकतो. मातीप्रमाणे थंड आणि आकारहीन लोकांना त्यांनी राष्ट्रभक्तीचे संस्कार देऊन शकांविरुद्ध उभे केले आणि त्यातून भारतभूमीला संकटमुक्त केले.

वर्ष प्रतिपदा हा पूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार, ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, त्यांचा जन्मदिवस आहे. संघामध्ये सहा उत्सव साजरे केले जातात. हे सर्व उत्सव समाजप्रबोधनाचे माध्यम आहेत. संघामध्ये कोणाचीही जयंती आणि पुण्यतिथी साजरी केली जात नाही. डॉ. हेडगेवार सुद्धा याला अपवाद नाहीत. संघामध्ये वर्ष प्रतिपदा हा सहा उत्सवांपैकी एक उत्सव आहे. तो त्याच्या पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे आहे. तो डॉक्टरांचा जन्मदिवस आहे म्हणून संघात उत्सव म्हणून साजरा केला जात नाही.

संघ हा व्यक्तिपूजक नाही. ज्या डॉक्टरांनी संघाची स्थापना केली त्यांनी सुद्धा जंगल सत्याग्रहामध्ये सहभागी होताना आपले सरसंघचालकपद डॉक्टर परांजपे यांना सोपविले. आज आपण समाजामध्ये एकाच पदाला वर्षानुवर्षे चिकटून राहणारे लोक बघतो, त्यावेळेस आपल्याला पूजनीय डॉक्टरांचे वेगळेपण लक्षात येते. संघामध्ये पद हा शब्द नाही. त्याला दायित्व असे म्हटले जाते. ''देअर आर नो डेकोरेटिव्ह पोस्ट्स इन आरएसएस.'' संघामध्ये शोभेचे कोणतेही पद नाही. प्रत्येकाला जबाबदारी समजून कार्य करावेच लागते.

स्वयंसेवकांना उद्देशून डॉक्टरजी म्हणतात की, आज जरी मी संघाचा सरसंघचालक असलो तरीसुद्धा उद्या तुम्हाला असे वाटले की मी या कामासाठी योग्य नाही तर माझ्यापेक्षा योग्य व्यक्तीला तुम्ही हे कार्य द्या. तुम्ही ज्याला नियुक्त कराल त्याच्या सोबत मी एक सामान्य स्वयंसेवक म्हणून कार्य करेल, असा विश्वास तुम्ही असू द्या.

संघामध्ये गुरू कोणाला मानले पाहिजे या विषयावर जेव्हा चर्चा झाली, त्यावेळेस स्वाभाविकपणे सर्व स्वयंसेवकांनी असे मत दिले की, डॉक्टरजी तुम्ही संघाची स्थापना केलेली आहे त्यामुळे तुम्हीच संघाचे गुरू असायला पाहिजे. त्यावेळेला त्यांच्या जागी दुसरी व्यक्ती असती तर तिला मनातून आनंद झाला असता व त्याने ''ठीक आहे बाबा, तुम्ही म्हणता तर मी गुरू होतो'' असे म्हटले असते. परंतु ते म्हणाले की, बघा आपल्या संघाचे काम काय आहे. आपल्याला हिंदूंचे संघटन करायचे आहे. हिंदू समाजाचे आयुष्य हे शेकडो, हजारो वर्षांचे आहे. इतक्या वर्षांपर्यंत त्याला मार्गदर्शन करेल अशा कुठल्यातरी प्रतीकाला आपण गुरुस्थानी ठेवले पाहिजे.

त्यानंतर भगव्या ध्वजाला गुरुस्थानी मानण्यात आले. या सर्व उदाहरणांकडून आपल्याला लक्षात येते की डॉक्टरांनी कधीही स्वतःचे कुणालाही स्तोम माजवू दिले नाही. संघामध्ये वर्ष प्रतिपदेच्या कार्यक्रमाच्या आधी आद्य सरसंघचालक प्रणाम देण्यात येतो. हा प्रणाम सुद्धा व्यक्तिपूजेचा भाग नाही, तर हा कार्यपद्धतीचा भाग आहे. त्याचबरोबर डॉक्टरांच्या जन्मदात



देशभक्तीला केलेला हा प्रणाम आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी संघाची स्थापना करून सर्वस्वाचा होम करणाऱ्या त्यांच्या त्यागी वृत्तीला हा प्रणाम आहे.

'' संघटना के पुण्यकार्य में कण कण होम किया था
हिंदुराष्ट्र है भारत तुमने यह उद्घोष किया था''

व्यवसायाने जरी ते डॉक्टर नसले तरी शिक्षणाने डॉक्टर होते. त्यांचे निदान अचूक होते. कोट्यवधी लोकांच्या देशावर मूठभर इंग्रज राज्य कसे करू शकतात, या प्रश्नाने त्यांना बेजार केलेले होते. देश आणि समाजाच्या समस्या ते बघत होते. देशाच्या इतिहासाचा त्यांनी अभ्यास केलेला होता. त्यातून जे सत्य त्यांच्या मनाला उमजलेले होते ते म्हणजे समाजामध्ये असलेली अनुशासनहीनता, स्वार्थकेंद्रिता, संघटनेचा अभाव, देशभक्तीला प्राधान्य नसणे, स्वबोध नसणे हे होय.

आता जे समाजात दोष आहेत ते कदाचित काही काळ काम केल्यावर निघून जातील, परंतु ते पुन्हा निर्माण होणार नाहीत असे नाही. ते निर्माण झाले असता त्याचे निराकरण पुन्हा कोण करणार? त्यामुळे वर्षानुवर्षे समाजातील, देशापुढील समस्यांना सोडवू शकेल अशी राष्ट्रभक्त, संघटित, नित्यसिद्ध शक्ती त्यांना हवी होती.

त्यांच्या दृष्टिकोनातून देशभक्ती ही काही तात्पुरती किंवा हंगामी भावना नव्हती. हंगामी देशभक्तीच्या भावनेने राष्ट्र कधीही संकटमुक्त होणार नाही हे त्यांना माहीत होते. म्हणूनच देशभक्तीची ज्योत सदा सर्वकाळ समाजामध्ये तेवत राहावी यासाठीच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.

संघाच्या स्थापनेनंतर संघाला उपेक्षेचा सामना करावा लागला. किशोरवयीन मुलांना एकत्र करून त्यांनी संघाची शाखा सुरू केली. किशोरवयीन मुलांसोबत उभे असलेले प्रसिद्ध पुढारी व क्रांतिकारक डॉ. हेडगेवार यांना पाहिल्यावर लोक थट्टा करायचे. संघ सुरू झाला तेव्हा त्याचे नाव ठरलेले नव्हते, प्रमुख कोण राहणार हे ठरलेले नव्हते, शाखा नावाची कार्यपद्धती सुद्धा ठरलेली नव्हती. देशासाठी कार्य करणारी देशभक्त, जागृत, सक्रिय संघटना उभी करायची एवढेच त्यांच्या मनामध्ये होते.

एखाद्या कळीचे फुलामध्ये रूपांतर व्हावे तसे संघाची कार्यपद्धती हळूहळू विकसित होत गेली. सुरुवातीला जे शब्द होते त्याचा पुढे मंत्र झाला. याच सामान्य कार्यपद्धतीतून असामान्य स्वयंसेवक व नेतृत्व निर्माण झाले. संघामध्ये आयात केलेल्या नेतृत्वाची आवश्यकता राहत नाही. जे येतात ते येथील कार्यपद्धतीतून संघकार्य करण्यासाठी कुशल बनतात.

पूजनीय डॉ. हेडगेवारांच्या काळामध्ये जे कुशपथक होते, त्या कुशपथकामध्ये बाल स्वयंसेवक म्हणून प्रवेश करणारे पूजनीय बाळासाहेब देवरस हे पुढे संघाचे तृतीय सरसंघचालक झाले. संघाने जातिभेद नष्ट करण्याच्या घोषणा दिल्या नाहीत, फक्त हिंदुत्वाच्या आधारावर संघटन सुरू ठेवले. त्याचा योग्य तो परिणाम झाला.

''जातीपंथ भाषेचे अंकुर कधी न येथे रुजले''

संघामध्ये कुठलीही घराणेशाही नाही. येथील सामान्य स्वयंसेवक सुद्धा संघाच्या सर्वोच्च सरसंघचालक पदावर आरूढ होऊ शकतो. संघाला घराणेशाहीचा इतिहास नाही.

पूजनीय डॉ. हेडगेवार यांच्यानंतर ''हू आफ्टर हेडगेवार'', ''हेडगेवार यांच्यानंतर कोण'' असा प्रश्न कधीही संघात निर्माण झाला नाही. डॉक्टरांच्या निधनानंतर सरसंघचालक कोण होईल याचे उत्तर डॉक्टरांनी पत्रामध्ये लिहून ठेवलेले होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे माधव सदाशिवराव गोळवलकर अर्थात श्रीगुरुजी हे संघाचे द्वितीय सरसंघचालक झाले.

त्यावेळेस श्रीगुरुजींपेक्षाही संघकार्याचा अधिक अनुभव असलेले अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ कार्यकर्ते संघामध्ये होते. तरीही संघामध्ये त्यांचे गट निर्माण झाले नाहीत, दुफळी माजली नाही. सगळ्यांनी डॉक्टरांचा आदेश शिरसावंद्य मानला. डॉक्टरांचे नेतृत्व असे असामान्य होते.

डॉक्टरांच्या निधनानंतर सरसंघचालकपद स्वीकारल्यानंतर बोलताना पूजनीय श्रीगुरुजी म्हणाले होते की, संघाचे सरसंघचालकाचे पद हे विक्रमादित्याचे सिंहासन आहे. या सिंहासनावर बसलेला गुराख्याचा पोर देखील योग्य तोच न्याय करेल.

आज संघाला शंभर वर्षे पूर्ण झालेले आहेत. समाजाला संघातून निर्माण झालेल्या विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राजकीय क्षेत्रात काम करणारी भाजप अशा संघटना व त्यांचे नेते माहीत आहेत. परंतु ज्यातून या फांद्या निर्माण झाल्या तो वटवृक्ष आणि तो वटवृक्ष ज्या बीजातून उत्पन्न झाला ते बीज म्हणजे पूजनीय डॉक्टर हेडगेवार हे अजूनही समाजाला माहीत नाही.

**थे अकेले आप, लेकिन बीज का था भाव पाया ।**
**बो दिया नीज को अमर वट, संघ भारत में उगाया ।**
**राष्ट्र ही क्या, अखिल जगत का आसरा हो जाय ।**
**और उसकी हम टहनियाँ पत्तियाँ बन जाय ।**
**हम सभी का जन्म तव प्रतिबिंब सा बन जाय ।**
**और अधुरी साधना चिर पूर्ण बस हो जाय ।**

डॉक्टरांनी जे कार्य सुरू केले ते अजूनही अपूर्ण आहे. वर्ष प्रतिपदा हा हिंदू नवीन वर्षाचा प्रारंभ दिवस आहे. हा नवसंकल्प दिवस आहे. स्वार्थत्यागी, राष्ट्रसमर्पित जीवन माझे बनावे यासाठी व्यक्ती म्हणून मी अल्पसा का होईना प्रयत्न करीन, अशा पद्धतीचा संकल्प करणे हा संघनिर्मात्याला केलेला प्रणाम असेल. हा नवसंकल्प हीच खरी वर्ष प्रतिपदा ठरेल.

राष्ट्र देवतेच्या या साधकास शतशत वंदन. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### 'स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष' रोखठोक मत

'स्वार्थ, सहकार्य आणि संस्कृतीचा संघर्ष' हा रोखठोकमधील लेख मानवी स्वभावाचे योग्य विश्लेषण करणारा आहे. एखाद्या परिस्थितीत कसलीही टंचाई निर्माण झाली की त्याचा साठा करणे हा मानवी स्वभाव आहे तर तो बंदिस्त ठेवून जास्त किमतीला विकणे ही तापल्या तव्यावर पोळी भाजायची विकृती आहे. आजच्या एलपीजी सिलेंडरची टंचाई ही खूपशी मानवनिर्मितच वाटते कारण सर्वसाधारणपणे सर्वांकडे दोन सिलेंडर असतात व एक संपला की दुसरा लावला जातो व नवीन सिलेंडरसाठी बुकिंग केले जाते. प्रश्न आहे तो बिनानंबरचे सिलेंडर घेणारे यांचा. मुळात आता गॅस कनेक्शन सहजगत्या मिळते तरीही काळ्या बाजारातून सिलेंडर घेणे चुकीचे आहे. त्यांना जर त्रास होत असेल तर ही त्यांच्या चुकीच्या वागण्याची परिणती आहे. एकूणच जेव्हा जग युद्धात लोटले गेलं आहे तिथे आपल्या देशात इंधनाचे दर स्थिर असून इराणने भारताच्या तेल बोटी सोडल्या आहेत त्यामुळे अति टंचाई होण्याची शक्यता कमीच वाटते. मुळात सर्वांनीच आपल्या साठेबाज वृत्तीला लगाम घालणे गरजेचे आहे. ▮

**माया हेमंत भाटकर**/९८६९०७४४९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लँट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -०८८८८७३६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अल्पवयीन विवाहितेवर अत्याचार : बालविवाह प्रकरणी पोलीस पाटील ग्रामसेवकावर होणार गुन्हे दाखल

तभा. वृत्तसेवा

**बीड |** अल्पवयीन महिलेस घरातून नेऊन तिच्यावर अत्याचार करुन बेशुद्ध अवस्थेत चावडीच्या खांबाला बांधल्याच प्रकरण घडलं होतं. या प्रकरणाची दखल महिला आयोगाने घेतली असून पीडित महिला अल्पवयीन असून बालविवाह प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत.



पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील हिवरा पहाडी येथे अल्पवयीन विवाहित महिलेला रात्री उचलून घेऊन जात तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला.पिडीता बेशुद्ध पडली असताना तिला गावच्या चावडीत खांबाला बांधून ठेवले. ही बात सकाळी गावकऱ्यांच्या नजरेस पडली. त्यानंतर खांबाला बांधलेल्या पीडीतेची सुटका करण्यात आली. सुटका करण्यापूर्वी तिचा व्हिडिओ देखील काढण्यात आला होता. ही घटना राज्यभर गाजली असून महिला आयोगाने या प्रकरणात लक्ष घातले आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी तपास अधिकाऱ्यांशी फोनवरुन संवाद साधला. आता, पीडित अल्पवयीन महिलेच्या विवाहावरुनही गुन्हा दाखल करण्याचे आदेश तपास अधिकारी अतुल कुमार लांडगे यांना दूरध्वनीवरून दिल्या आहेत.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम १३७(२),३३३,६४(२)(i) आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी वैभव पटेकर याला अटक करण्यात आली आरोपीला १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या तपासा दरम्यान पीडित मुलीचा गेल्याच वर्षी बालविवाह लावून देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या बालविवाहाच्या दृष्टीनेही गुन्हा दाखल करून लग्न लावून देणारे, लग्नास उपस्थित असणारे, पोलीस पाटील, ग्रामसेवक, सरपंच अशा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाच्या अध्यक्षा अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

## बीड जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ओमराजे सातपुतेचा डंका

**बीड |** द. बा. घुमरे पब्लिक स्कूल, बीड आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चंपावती शाळेचा विद्यार्थी ओमराजे परमेश्वर सातपुते याने प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे नाव उज्वल केले. स्पर्धेत आपल्या प्रभावी वक्तृत्वाने ओमराजेने सर्वांची मने जिंकली. या यशाबद्दल ओमराजेचा सन्मान सोहळा उत्साहात पारपडला. यावेळी माजी आमदार राजेंद्र जगताप, बाजार समितीचे माजी सभापती अरुण डाके, उद्योजक रमेश पोकळे आणि सचिव दीपक घुमरे यांच्या हस्ते ओमराजेला सन्मानचिन्ह व ५१०० रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ओमराजेच्या या यशात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंदांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून स्वागत होत असून, पालकांसह शाळेत आनंदाचे वातावरण आहे.

## महिलांचे उल्लेखनीय कार्य अभिमानास्पद - प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी
## नवकेशर सेवाभावी संस्थेकडून नवरत्न पुरस्कारांचे वितरण

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** येथील नवकेशर सेवाभावी संस्था, अंबाजोगाई संचलित नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमी यांच्याकडून नवकेशर नवरत्न पुरस्कार वितरण सोहळा-२०२६ नुकताच आयोजित करण्यात आला होता.



शहरातील टी.बी. गिरवलकर अभियांत्रिकी महाविद्यालयात रविवार, दिनांक १५ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी तर विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून सौ.कल्पना अनिकेत लोहिया, परमेश्वर गित्ते (संपादक), आयोजक भीमाशंकर शिंदे, प्रा.सौ.आरती भीमाशंकर शिंदे (लिंबगावकर) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सौ.अर्चना चौरे, सौ.महादेवी कांबळे, सौ.अंजली लोहिया, लता रोडगे, कु.साक्षी लोमटे, सौ.अनुराधा निकम, डॉ.सुनीता तोंडगे, चित्ररेखा बांगर आणि सय्यद तरन्नुम अहमद अली यांना नवकेशर नवरत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, फेटा व शाल असे होते. यावेळी प्रास्ताविक करताना

संस्थेचे सचिव भिमाशंकर शिंदे यांनी सांगितले की, नवकेशर सेवाभावी संस्था, अंबाजोगाई संचलित नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमी यांच्याकडून मागील १२ वर्षांपासून नवकेशर नवरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यावर्षीचा पुरस्कार वितरण सोहळा - २०२६ आज रविवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत. आपण समाजाचे काही देणे लागतो. या भूमिकेतून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून त्यांना व समाजातील इतर महिलांना प्रेरित करणे हा या कार्यक्रमा मागचा आमचा विधायक हेतू व प्रयत्न आहे असे आयोजक शिंदे यांनी सांगितले. तर यावेळी बोलताना पत्रकार परमेश्वर गित्ते म्हणाले की, विविध क्षेत्रातील ९ महिलांना निवडून त्यांना नवकेशर नवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करणे खरोखरच कठीण काम आहे. परंतु, नवकेशर संस्था अतिशय प्रामाणिकपणे व योग्य महिलांना निवडून त्यांचा यथोचित सन्मान करते ही बाब अभिनंदनीय आहे. याप्रसंगी बोलताना

## ज्येष्ठ विधिज्ञ विलास सोनवळकर यांचे निधन



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई येथील रहिवाशी आणि छत्रपती संभाजी नगर येथील मुंबई उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठातील ज्येष्ठ विधीज्ञ विलास राजाराम पंत सोनवळकर यांचे १४ मार्च शनिवार रोजी दुःखद निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते .गेल्या दोन महिन्यापासून ते छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू होते . शनिवारी पहाटे त्यांचे दुःखद निधन झाले. विलास सोनवळकर हे अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी होते. गेल्या ४० वर्षापासून ते छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात वकिली करत होते. श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधीज्ञ सुरेश सोनवळकर यांचे ते लहान बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन अविवाहित मुली असा परिवार आहे. १४ मार्च शनिवार रोजी त्यांच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर येथील प्रताप नगर स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रसंगी त्यांचे नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

## माऊली जगताप यांचे निधन



तभा. वृत्तसेवा

**गेवराई प्रतिनिधी |** तालुक्यातील बागपिंपळगावचे सरपंच रामेश्वर जगताप यांचे बंधू माऊली उत्तमराव जगताप ( वय ४० ) यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे रविवार दि.१५ रोजी दुपारी ३ च्या सुमारास निधन झाले.

या बाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील बागपिंपळगावचे सरपंच रामेश्वर जगताप ( यांचे लहाने बंधू माऊली जगताप यांना रविवार दि.१५ रोजी अस्वस्थ वाटू लागल्याने ते तात्काळ गेवराई येथील खाजगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल झाले परंतु रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला या झटक्यात त्यांची प्राणज्योत मालवली. माऊली जगताप यांचे मोठा जनसंपर्क होता. ते लोकांच्या सुख दुःखात नेहमी सहभागी असायचे त्यांच्या निधनामुळे जगताप कुटूबांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला असून माऊली जगताप यांच्या निधनामुळे गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ असा मोठा परिवार आहे. सोमवार दि.१६ रोजी बागपिंपळगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक आप्तेष्ट नातेवाईक मित्र मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऊस कामगारांसाठी योजनांची अंमलबजावणी होणार

**बीड |** आमदार सुरेश धस यांनी पुणे येथील सामाजिक न्याय भवनातील मध्यवर्ती कार्यालयात लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा बीडच्या माजी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी ऊसतोडणी कामगारांच्या हितासाठी पथदर्शी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत पुढील काळात आवश्यक पावले उचलली जातील, असे आश्वासन एमडी मुधोळ यांनी दिले आहे. मुधोळ यांनी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा पदभार स्वीकारला आहे. यामुळे त्यांची भेट घेऊन विविध प्रश्नांबाबत आ.धस यांनी चर्चा केली. यावेळी आमदार धस यांनी २०२२ मध्ये राज्य शासनाने स्थापन केलेल्या ऊसतोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून जाहीर करण्यात आलेल्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. ऊसतोडणी कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देणे, कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा व वसतिगृहांची उपलब्धता, कामगारांना अपघाती विमा संरक्षण तसेच गळीत हंगामात बैलांच्या अपघाती मृत्यू अथवा जखमी झाल्यास देण्यात येणारे सानुग्रह अनुदान तातडीने मिळणे गरजेचे असल्याची मागणी त्यांनी केली.

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची देवगिरी प्रदेश कार्यकारिणी बैठक अंबाजोगाई येथे संपन्न

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** दि १४ व १५ मार्च रोजी पार पडलेल्या बैठकीत १०० पेक्षा अधिक प्रदेश कार्यकारिणी सदस्य उपस्थित - विद्यार्थी प्रश्न व संघटनात्मक विस्तारावर सखोल चर्चा.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेश कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक १४ व १५ मार्च २०२६ रोजी अंबाजोगाई येथील टी. बी. गिरवलकर तंत्रनिकेतन महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

दोन दिवस चाललेल्या या बैठकीस देवगिरी प्रदेशातील एकूण १०० प्रदेश कार्यकारिणी सदस्य आणि व्यवस्थेतील तसेच अन्य ३५ असे एकूण१३५ कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत विद्यार्थ्यांसमोरील विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली. यासोबतच







संघटनात्मक बळकटी, आगामी उपक्रमांचे नियोजन आणि विद्यार्थी चळवळीच्या आगामी दिशेबाबत व्यापक विचारमंथन करण्यात आले.

देवगिरी प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. सुरेश मुंडे, प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नावरे, प्रदेश संघटनमंत्री सिद्धेश्वर लटपटे, बीड विभाग संघटनमंत्री ज्ञानेश्वर उद्देवाल तसेच पश्चिम क्षेत्रीय संघटनमंत्री गीतेशजी चव्हाण यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. बैठकीत एकूण आठ सत्रांचे प्रभावी आयोजन करण्यात आले.

बैठकीदरम्यान विद्यार्थी चळवळीची आगामी दिशा, शैक्षणिक क्षेत्रातील सध्याची आव्हाने, संघटनात्मक विस्तार आणि समाजाभिमुख उपक्रम यांवर सखोल चर्चा झाली. यावर्षी छत्रपती संभाजीनगर येथे अभाविपतर्फे यशस्वीपणे आयोजित करण्यात आलेल्या DIPEX उपक्रमाचा विशेष उल्लेख करण्यात आला.

तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या वाढत्या अनुपस्थितीबाबत करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या काळात श्रम अनुभूती शिबीर, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम, पक्षीमित्र अभियान, वसतिगृह सर्वेक्षण यांसारखे विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. बैठकीची संपूर्ण व्यवस्था अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. व्यवस्था प्रमुख डॉ. सचिन कळलावे आणि शहर मंत्री अक्षय सोळंके यांनी बैठकीचे व्यवस्थापन पाहिले. तसेच कु. मयुरी, श्रावणी, पूनम, गायत्री, प्रियांका, शुभम, कृष्णा, मंगेश, आयुष, आदित्य आणि महेंद्र यांनी बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. दोन दिवस चाललेल्या या प्रदेश कार्यकारिणी बैठकीमुळे देवगिरी प्रदेशातील विद्यार्थी चळवळीला नवी ऊर्जा मिळाली असून आगामी काळात विद्यार्थीहितासाठी विविध उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवणे याबरोबर येणाऱ्या शैक्षणिक वर्षात देवगिरी प्रांतात १२५००० विद्यार्थ्यांची सदस्यता करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

### अंबाजोगाईत महिला क्रिकेटची मुहूर्तमेढ माही परमार यांनी रोवली - डॉ.राजेश इंगोले
## जागतिक महिला दिनानिमित्त क्रिकेट प्रशिक्षक माही परमार यांचा सन्मान

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या क्रिकेट प्रशिक्षिका तसेच क्रीडा पत्रकार माही परमार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रात महिलांनी केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि समाजात त्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमी ही संस्था स्थानिक पातळीवर क्रिकेटला चालना देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. ग्रामीण आणि शहरातील युवा खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे, त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे तसेच क्रीडा क्षेत्रात नवे खेळाडू घडवणे हा अकॅडमीचा मुख्य उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी सातत्याने



विविध क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धेदरम्यान विविध सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अनेक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्रात महिलांचे योगदान अधोरेखित करण्याच्या उद्देशाने क्रिकेट प्रशिक्षिका तथा क्रीडा पत्रकार माही परमार यांचा अंबाजोगाईतील क्रिकेट मधील अमूल्य योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. . या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, माही परमार यांना मी खूप जवळून ओळखतो.

माही परमार या क्रिकेट क्षेत्रात अनेक वर्षांपासून सक्रिय असून महिला क्रिकेटच्या विकासासाठी त्या सातत्याने कार्य करत आहेत. त्या एक कुशल क्रिकेट प्रशिक्षिका म्हणून अनेक तरुण खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. त्याचबरोबर त्या क्रीडा पत्रकारितेतही उल्लेखनीय काम करत असून महाराष्ट्र स्पोर्ट्स या न्यूज चॅनेलच्या संपादक म्हणून कार्यरत आहेत. तसेच स्पोर्ट्स प्लस या दैनिकामध्ये महाराष्ट्र महिला क्रिकेट प्रतिनिधी प्रमुख म्हणून त्या जबाबदारी पार पाडत आहेत. महिला क्रिकेटला योग्य व्यासपीठ मिळावे, महिला खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्याला व्यापक प्रसिद्धी मिळावी यासाठी माही परमार सातत्याने प्रयत्न करत असतात. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन त्या महिला क्रिकेटच्या विकासासाठी मार्गदर्शन करत आहेत. अनेक नवोदित महिला खेळाडूंना त्यांनी प्रेरणा दिली असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक खेळाडूंना पुढे जाण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्रभर महिला क्रिकेटच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय मानले जाते. क्रिकेट प्रशिक्षिका, क्रीडा पत्रकार आणि क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्त्या या तिन्ही भूमिकांमध्ये त्यांनी सातत्याने काम करत महिला क्रिकेटला बळकटी देण्याचे काम केले आहे. त्यामुळेच त्यांच्या या कार्याची दखल घेत अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला

## तू रंगाने काळी म्हणत सासर कडून प्रचंड त्रास; विवाहितेची विष पिऊन आत्महत्या

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव |** "तू रंगाने काळी आहेस" असे म्हणत सासरच्या मंडळींकडून सातत्याने मानसिक छळ होत असल्याच्या कारणावरून विवाहितेने विष पिऊन आत्महत्या केल्याची घटना तालखेडा येथे घडली आहे.

तालखेडा गावातील ज्योती पवार या महिलेचा विवाह २०१८ मध्ये तळतांडा येथील कृष्णा पवार यांच्याशी झाला होता. लग्नानंतर काही दिवस सर्व काही सुरळीत होते. मात्र त्यानंतर सासरच्या मंडळींकडून पतीच्या व्यवसायासाठी माहेरून पैसे आणण्याचा दबाव टाकत तिचा छळ सुरू झाल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.सासरच्या मंडळींकडून "तू रंगाने काळी आहेस, त्यामुळे आम्हाला आवडत नाहीस," असे म्हणत ज्योतीचा सातत्याने मानसिक छळ केला जात होता. सततच्या छळाला कंटाळून ज्योतीने १२ जानेवारी २०२६ रोजी विष प्राशन केले. त्यानंतर तिला छत्रपती संभाजीनगर आणि नंतर पुणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान १८ जानेवारी रोजी तिचा मृत्यू झाला. दरम्यान दुःखाने कोसळलेल्या आई-वडिलांनी सुरुवातीला तक्रार दाखल केली नव्हती. मात्र १३ मार्च रोजी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात ज्योतीच्या सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तिचा पती कृष्णा पवार, सासरा मनोहर पवार आणि सासू ताराबाई पवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस करत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच नियमित व्यायाम देखील करावा : डॉ श्रीनिवास रेड्डी
## शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सामान्य ज्ञान परीक्षा 2026 चा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच दररोज नियमितपणे व्यायाम देखील करावा असे आवाहन अंबाजोगाई शहरातील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ श्रीनिवास रेड्डी यांनी केले आहे. ते शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने प्रतिवर्षी घेण्यात येणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते. यावर्षी स्पर्धेचे हे ४ थे वर्ष होते. स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा हा शनिवार दि १४ रोजी संकल्प विद्यालय अंबाजोगाई येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम न्यूजचे संपादक सुदर्शन रापतवार तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ श्रीनिवास रेड्डी, संकल्प विद्यालयाचे संचालक प्रा.कैलास चोले,नगरसेवक आकाश कराड आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून त्याचबरोबर राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी करताना या सामान्य ज्ञान परीक्षेच्या मागचा हेतू विषद केला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ श्रीनिवास रेड्डी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात आपला अभ्यास चांगला व्हावा यासाठी आपण निरोगी व सुदृढ असले पाहिजे याकरिता दररोज किमान २० मिनिटे हलका व्यायाम करावा असे आवाहन केले. दररोज एक सफरचंद खावे जेणे करून आपल्या शरीराचे पोषण



चांगल्या प्रकारे होईल. याबरोबरच आपला अभ्यास सुद्धा आपण नियमित करावा जेणेकरून स्पर्धेच्या युगामध्ये स्वतःला ज्ञानाच्या बाबतीत परिपूर्ण होता येईल असेही नमूद केले. यावेळी प्रा कैलास चोले यांनी सदरील सामान्य ज्ञान परीक्षा शिक्षक मैत्री प्रतिष्ठानच्या वतीने अतिशय उत्कृष्ट रित्या व स्पर्धा परीक्षेच्या तोडीस तोड पद्धतीने घेण्यात येते व यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा मोठ्या प्रमाणावर सहभागी होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जरी बक्षीस मिळाले नाही तरी विद्यार्थी राष्ट्र पुरुषांच्या जीवन कार्याची माहिती घेतात त्यामुळे त्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती प्राप्त होते असे सांगून स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घ्यावी असे सांगितले.

शेवटी कार्यक्रमाचा समारोप करताना सुदर्शन रापतवार यांनी विद्यार्थ्यांना पुढे चालून खूप साऱ्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जायचे असेल तर आता पासूनच अशा प्रकारच्या स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग घ्यावा व आपल्या वाचनाचा सराव वाढवावा जेणेकरून आपणास खूप सारे ज्ञान मिळेल असे आवर्जून उल्लेखित केले. शेवटी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे सचिव विष्णू सरवदे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या स्पर्धेमध्ये इयत्ता ५ ते ७ वी या गटामध्ये जि प प्रा शा सोनवळा शाळेची विद्यार्थिनी कु स्नेहा सोनेराव पतंगे हिने प्रथम क्रमांक मिळवत रोख १५०१/- रुपये , सन्मानचिन्ह पटकावले. द्वितीय क्रमांक चि.अर्जुन संतोष कदम स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर रोख १००१/- रुपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांक चि स्वराज सोमेश्वर उदावंत संकल्प विद्यालय अंबाजोगाई रोख ७०१/- रुपये सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र तर इयत्ता ८ ते १० गट मध्ये प्रथम क्रमांक कु तनिष्का जनाबाई बळीराम मुंडे संकल्प विद्यामंदिर रोख १५०१/- रुपये, सन्मानचिन्ह , द्वितीय क्रमांक कु.कृष्णा संतोष कदम रोख १००१/- , सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र , तृतीय क्रमांक प्राप्त कु मायरा मोहम्मद नसीर शेख गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळा व चि श्रेयस सतीश केंद्रे खोलेश्वर विद्यालय अंबाजोगाई यांना प्रत्येकी रोख ७०१/- रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वीते साठी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे ,कोषाध्यक्ष साधू गायकवाड, सल्लागार उमेश नाईक, संदीप दरवेशवार,अनुरथ बांडे, दीपक बिडवे, बाळासाहेब माने, महेश वेदपाठक यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्रतिबंधीत गुटखा, अवैध गोवंशाची वाहतुक करणाऱ्यांविरोधात कारवाई

## १२ लाख ३४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, स्थागुशाची कारवाई





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

शहरातील अकोला बायपास येथे दोन वाहनांमध्ये अवैधरित्या, दाटीवाटीने, निर्दयपणे गोवंशाची वाहतुक करणारी दोन वाहने तसेच सेनगाव तालुक्यातील जामदया शिवारात शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखाची वाहतुक केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करीत दोन्ही गुन्ह्यात १२ लाख ३४ हजार रूपयांचा मुद्देमालासह आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार स्थानिक गुन्हे शाख-ेचे पथक पेट्रोलिंगवर असतांना मिळालेल्या गोपनीय माहीतीनुसार अकोला बायपास हिंगोली येथे जब्बार खान सत्तार खान पठाण वय ३६ पंचशील नगर वाशिम आणि वाहीद शेख मुक्तार वय २६ रा बागवानपुरा वाशिम, शेख शाहीद शेख मुक्तार वय २७ रा बागवानपुरा वाशिम यांनी संगनमत करून बोलेरो पिकअप क्र एमएच ३० बीडी ००२९ आणि एमएच २७ एक्स ४४२५ या चारचाकी वाहनांमध्ये ४ गोवंश बैल अंदाजे किंमत २ लाख रूपये दाटीवाटीने व निर्दयीपणे भरून कुठलेही दाखले व वाहतुकीचा पर-वाना नसतांना वाहतुक करीत असतांना मिळून आले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ दोन्ही वाहनांसह गोवंश ताब्यात घेतले तसेच आरोपीविरूध्द हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम १९९५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. आरोपींकडून १० लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दुसऱ्या कारवाईमध्ये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून परसराम आयाजी घुगे वय ३२ रा हुडी सेनगाव यास मौजे जामदया शिवारातील जामदया ते वडहिवरा जाणाऱ्या रस्त्यावर शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा किंमती १ लाख ७५ हजार गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व मोबाईल असा एकूण २ लाख ३४ हजार रूपयांचा मुद्देमालासह ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि माधव जिव्हारे, उपनि दिलीप मोरे, अंमलदार मुकींदा मगरे, पांडुरंग राठोड, नितीन गोरे, संदीप जाधव, सुभाष घुगे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, ज्ञानेश्वर पायघन, धनंजय क्षीरसागर, आझम प्यारेवाले, शिवाजी इंगोले यांनी केली आहे.

# अप्पर पैनगंगा प्रकल्प इसापूर धरणाचे नामकरण आता आद्यक्रांतीवीर नोवसाजी नाईक- खा. रामराव वडकुते



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

अप्पर पैनगंगा प्रकल्प इसापूर धरणास आद्य क्रांतीवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय असे नाव देण्याबाबत शासन निर्णय काढण्यात आला असल्याची माहीती राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येथील शासकीय विश्रामगृहात १६ मार्च रोजी राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी बोलतांना त्यांनी सांगितले की, अप्पर पैनगंगा प्रकल्प इस-ापूर धरणास आद्य क्रांतीवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय असे नाव देण्याबाबत दि ९ आक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय काढला होता. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. मी राज्यसभा खासदार होताच या धरणास राजे नोवसाजी नाईक जलाशय नामकरण देण्यात यावे याबाबत पाठपुरावा सुरू केला. दि १२ मार्च रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासन निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आ-हेत. अप्पर पैनगंगा प्रकल्प इसापूर हा राज्यातील विदर्भ आणि मराठवाडा या भागातील महत्वाचा सिंचन प्रकल्प आहे. या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी महत्वाचा जलस्त्रोत आहे. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, पुरोहीत, के के शिंदे, बाळू नाईक यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी धनगर आरक्षणाबाबत बोलतांना खा वडकुते म्हणाले की, खासदारकीच्या माध्यमातून मला जिल्ह्याचवा विकास करण्याची मला संधी मिळाली आहे. धनगर आरक्षण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच देणार असा विश्वास व्यक्त करीत अनुसुचीत जमातीचे लाभ धनगर समाजातील १ लाख तरूणांना मिळत आहेत. कायदेशीरदृष्टया आरक्षणाची प्रक्रिया चालू आहे. भारतीय जनता पक्षच धनगर समाजाला न्याय देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# नर्सी नामदेव येथील स्मशानभूमीची दुरावस्था, प्रशासन झोपेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे जन्मस्थान असलेल्या नरसी नामदेव नगरीचा कायापालट करण्यासाठी सध्या मंदिर परिसराच्या सुशोभीकरणाचे आणि विकासाचे काम युद्धपातळीवर प्रगतीपथावर आहे. मात्र, याच मंदिराच्या अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या हिंदू स्मशानभूमीची प्रचंड दुरवस्था झाली असून, प्रशासनाचे याकडे सपशेल दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. एकीकडे 'विकास' तर दुसरीकडे 'दुर्दशा' अशी अवस्था झाली आहे. शासनाकडून नरसी नामदेव विकास आराखड्यांतर्गत मंदिराच्या सुशोभीकरणासाठी कोट्यवधींचा निधी खर्च केला जात आहे. हे काम प्रगतीपथावर असल्याने भाविकांमध्ये समाधान आहे. परंतु, जिथे मानवी जीवनाचा अंतिम प्रवास संपतो, त्या स्मशानभूमीची अवस्था पाहून नागरिक संताप व्यक्त करत आहेत. स्मशानभूमीच्या परिसरात वाढलेले रानगवत, मोडकळीस आलेले शेड आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नातेवाईकांना म-ोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मंदिरासाठी निधी येतो, मग स्मशानभूमीच्या दुरुस्तीसाठी का नाही? पावसाळ्यात येथे चिखलाचे साम्राज्य असते, बसण्यासाठी जागा नाही आणि पिण्याच्या पाण्याचीही सोय नाही. माणसाचा शेवटचा प्रवास सन्मानाने व्हावा एवढीच नागरिकांची माफक अपेक्षा आहे, अशा भावना येथील स्थानिकांनी व्यक्त केल्या आहेत. एकीकडे तीर्थक्षेत्राचा दर्जा वाढवत असताना, मूलभूत सार्वजनिक सोयींकडे दुर्लक्ष करणे कितपत योग्य आहे? असा सवाल आता उपस्थित होत आहे.



**हिंगोली- पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्यावतीने जीील्हाधिकारी यांना पत्रकारांच्यावतीने मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी अध्यक्ष कल्याण देशमुख, राकेश भट्ट, सुनील पाठक, विजय गुंडेकर यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### नर्सी येथील कयाधू नदीच्या पुनरूज्जीवनाला वेग



हिंगोली- तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र नरसी नामदेव येथील मंदिर परिसरातून वाहणाऱ्या कयाधू नदीच्या पात्राचे खोलीकरण आणि नूतनीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. नदीपात्रातील गाळ काढण्यासाठी जेसीबीचा वापर केला जात असून यामुळे नदी प्रवाही होण्यास मदत होणार आहे. याठिकाणी हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. तत्पूर्वी कयाधू नदीमध्ये स्नान करीत असतात. नदीच्या खोलीकरणामुळे नदी पात्रात पाणी राहील्यास याचा स्थानिकांना तसेच भाविकांनाही लाभ होणार आहे. भाविक आणि स्थानिक नागरिकांमधून या कामाचे स्वागत होत आहे.

### औंढा नागनाथ येथे ग्रंथालय संघाचे अधिवेशन

हिंगोली- जिल्हा ग्रंथालय संघाचे २३ वे आणि औंढा नागनाथ तालुका ग्रंथालय संघाचे १ अधिवेशन दि १७ मार्च रोजी औंढा नागनाथ येथे आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता आ. संतोष बांगर यांचेहस्ते होणार असून यावेळी अध्यक्षस्थानी मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक यांची उपस्थिती असणार आहे. सत्कारमूर्ती म्हणून निर्मलकुमार सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी ग्रंथालय संघाचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांचीही प्रमुख उपस्थिती असणार आहे. पहिले सत्राचे अध्यक्ष डॉ राजशेखर बालेकर, असणार असून शासकीय अनुदानाशिवाय ग्रंथालय आर्थिक सक्षम करण्याचे उपाय या विषयावर चर्चा होणार आहे. दुसऱ्या सत्रात अध्यक्षस्थानी डॉ राजेंद्र सानप यांची उपस्थिती असणार असून वाचक वाढीसाठी करावयाची उपाय योजना या विषयांवर चर्चा होणार आहे. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा जी पी मुपकलवार यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यवाह प्रा विलास वैद्य तर सुत्रसंचलन नीळकंठ देव हे करणार आहेत.



नांदेड येथे झालेल्या महिला सन्मान सोहळा २०२६ मध्ये जागृती मराठा महिला मंडळाने एकादशीनिमित्त वारकरी संप्रदायाचे सादरीकरण केले. या सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी डॉ राधिका देशमुख, डॉ वसुंधरा सुमंत, अनुपमा देशमुख, विद्या देशमुख, लिला जाधव, सीमा मगर, सुनीता सवनेकर, वर्षा वडगावकर, अर्चना देशमुख, अनुराधा पवार, संगीता चापके आदींनी सहभाग घेतला.

# गॅस सिलेंडरचा काळा बाजार रोखण्यासाठी भरारी पथकांची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

जिल्ह्यात गॅस सिलेंडरचा ग्राहकांना सुरळीत पुरवठा व्हावा तसेच काळा बाजार रोखण्यासाठी प्रशासनाने सात भरारी पथकांची स्थापना केली असून याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी काढले आहेत. या पथकाकडून जिल्हाभरातील हॉटेल्स, ढाबे, कॅफे, खानावळींची तपासणी करून घरगुती गॅसचा वापर होत असल्याचे आढळल्यास कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

घरगुती गॅस सिलेंडर सुरळीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर किंवा साठेबाजी झाल्यास सर्वसामान्य ग्राहकांना सिलेंडर मिळण्यास कठीण परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

यावर उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यापूर्वीच गॅस एजन्सीधारकांची बैठक घेतली होती. आता सात भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. हिंगोली शहरासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी अप्प-ासाहेब पाटील, उपनिरीक्षक राहुल महिपाळे, महसूल सहाय्यक प्रदीप काळबांडे यांचा पथकात समावेश आहे. हिंगोली ग्रामीण भागासाठी निरीक्षण अधिकारी अनिल घुगे, उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, लिपीक गोपाल शेळके, वसमत शहरासाठी निरीक्षण अधिकारी पांडुरंग हांडे, उपनिरीक्षक शिवाजी बोंडले, पिलीक गणेश जाधव, वसमत ग्रामीणसाठी नायब तहसीलदार विनोद डोणगावकर, उपनिरीक्षक एकनाथ डक, लिपीक राहुल कांबळे, कळमनुरी तालुक्यासाठी निरीक्षण अधिकारी अमोल घुगे, उपनिरीक्षक संतोष इंगळे, गोदाम व्यवस्थापक पंकज चौधरी, सेनगाव तालुक्यासाठी निरीक्षण अधिकारी विशाल लोहटे, उपनिरीक्षक नागनाथ पाटील, पुरवठा निरीक्षक अभिजीत बोबडे, औंढासाठी नायब तहसीलदार प्रवीण ऋषी, उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पुरवठा निरीक्षक कल्याणी हटकर यांचा या पथकांमध्ये समावेश आहे.

# आज हिंगोलीत ज्ञानियांचा राजा-मोगरा फुलला कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेतील तेजस्वी संत व्यक्तिमत्त्व असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर ज्ञानियांचा राजा – मोगरा फुलला हा विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवार, दिनांक १७ मार्च २०२६ रोजी सायं. ६.०० वाजता शिवाजी देशमुख सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी, भावार्थदीपिका यांसारख्या ग्रंथांद्वारे अध्यात्म आणि तत्त्वज्ञान सर्वसामान्यांच्या बोलीभाषेत मांडले. समता, प्रेम, भक्ती आणि मानवतेचा संदेश देत त्यांनी समाजमनात प्रबोधनाची ज्योत पेटवली. त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनावर स्पष्टपणे जाणवतो. त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित हा कार्यक्रम त्यांच्या विचारसंपदेचा आणि संतपरंपरेचा गौरव करणारा ठरणार आहे. या कार्यक्रमात ज्ञानियांचा राजा – मोगरा फुलला या संकल्पनेवर आधारित विशेष सादरीकरण होणार असून प्रख्यात व्याख्याते गणेश शिंदे यांचे संत ज्ञानेश्वरांच्या अध्यात्मदर्शनावर आणि त्यांच्या विचारांच्या सामाजिक परिणामांवर आधारित प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या म-ार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. संतपरंपरेचे संवर्धन, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि समाजात आध्यात्मि-क जागर निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समृद्ध अध्यात्मपरंपरेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, म-हाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# आदर्श महाविद्यालयात उद्योजकता जागरूकता कार्यक्रमांतर्गत एक दिवशीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

येथील आदर्श शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान म-हाविद्यालयात वाणिज्य विभाग व प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान यांच्या संयुक्त विद्यम-ाने उद्योजकता जागरूकता कार्यक्रमांतर्गत एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

सदरील कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. प्रास्ताविकात वाणिज्य विभागप्रमुख डॉ. आशिष गट्टाणी यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे महत्त्व, स्टार्टअप संधी, रोजगारनिर्मिती व आत्मनिर्भरतेचा मार्ग याबाबत मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात युवकांनी नोकरीकडे पाहण्याबरोबरच स्वत:चा व्यवसाय उभारण्याचा दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे, असे यावेळी सांगण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन उद्योजकतेचे ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन केले. कार्यशाळेस निमंत्रित व्याख्याते म्हणून विकास गोफणे तसेच सौ. वर्षा मसुरे उपस्थित होते. उद्योजकता जागरूकता कार्यक्रम हे संभाव्य विद्यार्थी आणि उद्योजकांना ओळखण्यासाठी आणि त्यांना प्रेरित करण्यासाठी तयार करण्यात आला आहे, त्यांना विविध उद्योजकीय पैलूंबद्दल, सरकारी धोरणांबद्दल, निधीच्या संधींबद्दल आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी कौशल्य विकासाबद्दल ज्ञान प्रदान करण्यासाठी आणि व्यवसाय स्थापन करण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी व्यक्तींना पोषण आणि शिक्षित करण्यासाठी डिझाइन केले आहेत. असे मत गोफणे यांनी व्यक्त केले. सद-रील कार्यक्रमास सौ. वर्षा मसुरे उपस्थित होत्या त्यांनी संकटातून मार्ग काढत व्यवसाय कसा करावा हे स्वतः च्या अनुभवावरून विद्यार्थ्यां समोर मांडला. त्यांनी उद्योजकतेची संकल्पना, व्यवसाय सुरू करण्याच्या संधी, लघुउद्य-ोगाचे नियोजन, विपणन धोरणे तसेच प्रत्यक्ष उद्योजकीय अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी समन्वयक डॉ. सचिन पत्की, नोडल ऑफिसर प्रा. अमजद खान पठाण, डॉ. दयाराम मस्के तसेच डॉ. राजाराम पिंपळपल्ले उपस्थित हो-ते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. विशाल गायकवाड यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. बस्वराज लक्षटे यांनी केले. सदरील प्रशिक्षण कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. सोनाली दाड, प्रा. सुजाता मुंदडा व प्रा. अम-रनाथ जाधव तसेच द्वारकादास टापरे, धम्मपाल इंगोले, शेख जावेद, मदन बैस यांनी परिश्रम घेतले.

# ७५ संशयीत ऱ्हदयरूग्ण विद्यार्थ्यांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ मार्च**

राष्ट्रीय बाल आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या वैद्यकीय पथकाकडून ० ते १८ वर्ष वयोगटातील ७५ संशयीत ऱ्हदयरूण विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

बालाजी हॉस्पीटल भायखळा मुंबई येथील कार्डीयालॉजीस्ट डॉ जयश्री मिश्रा व डॉ प्रतीक मिश्रा यांनी विद्यार्थ्यांची २ डी इको तप-ासणी केली. तपासणी अंती १० विद्यार्थी शस्त्रक्रियेकरिता संदर्भीत करण्यात आले आहेत. या शिबीरास जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ नितीन तडस, अधिष्ठात डॉ चक्रधर मुंगल, वैद्यकीय अध-ीक्षक डॉ दिपक मोरे, डॉ शैलजा कुप्पास्वामी, डॉ गोपाल कदम, डॉ नितीन पुरोहीत, डॉ स्नेहल नगरे, डॉ अमोल देशमुख, डॉ नितीन अग्रवाल, चिंचकर, आशा क्षीरसागर, डॉ संतोष नांदूरकर, श्रीमती कदम यांच्यासह राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील कर्मचारी, अधिपरिचारीका यांची उपस्थिती होती.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महापालिकेला जीएसटी अनुदान मिळवून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ अंतर्गत राज्यातील महानगरपालिकांना वाढीव अनुदान मिळण्याबाबत शासनाने अभ्यास समिती स्थापन केली आहे. या समितीने लातूर शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनास सकारात्मक शिफारस करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महानगरपालिका स्वच्छता निरीक्षक संवर्ग संघटनेच्या वतीने माजी मंत्री आ. अमित देशमुख यांना निवेदन देण्यात आले.

राज्यातील महानगरपालिकांना जीएसटी अनुदान किंवा सहायक अनुदान मिळण्याबाबत सध्या शासन स्तरावर हालचाली सुरू आहेत. यासाठी नेमण्यात आलेल्या अभ्यास समितीसमोर आर्थिक लातूर महापालिकेची बाजू भक्कमपणे मांडली जावी, अशी विनंती संघटनेच्या वतीने करण्यात आली. लातूर शहर महानगरपालिकेच्या सक्षमीकरणासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या हितासाठी हे अनुदान अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी आमदार अमित देशमुख यांनी संघटनेच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन याप्रकरणी योग्य पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी संघटनेचे सचिव शिवराज धोंडीराम शिंदे यांच्यासह मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, रवी कांबळे, अक्रम शेख, अमजद शेख, अमोल मगर, महादेव फिस्के, रवी शेंडगे, समीर शेख व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## दोन दिवसीय ग्रंथोत्सवाची उत्साहात सांगता

# ग्रंथांमुळे माणसाच्या आयुष्याला परिपूर्णता येते : डॉ. नागोराव कुंभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** व्यक्तीला ज्ञान समृद्ध करण्याचे सामर्थ्य केवळ ग्रंथांमध्ये आहे. ग्रंथांमुळे माणसाच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने परिपूर्णता येते,असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी लातूर ग्रंथोत्सव २०२५ च्या समारोप प्रसंगी बोलताना केले.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने औसा येथे दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथोत्सवाचा समारोप रविवारी सायंकाळी झाला. समारोपाच्या या सत्राचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी भूषविले. यावेळी जिल्हाभरातील उत्कृष्ट वाचक सभासदांचा सन्मानही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी औसा येथील तहसीलदार



घनश्याम आडसूळ, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, कार्यवाह राम मेकले, मुक्तेश्र्वर शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या मार्गदर्शनात प्राचार्य डॉ. कुंभार यांनी मानवाच्या जीवनातील ग्रंथांचे स्थान किती अत्युच्च दर्जाचे आहे, याविषयीची अनेक उदाहरणे प्रस्तुत केली. ग्रंथांशिवाय मानवाची कल्पनाच करवत नसल्याचे सांगून ते म्हणाले की, माणसातील माणुसकी घडविण्याची किमया फक्त ग्रंथांमुळे घडू शकते.ग्रंथांशिवाय मानवजातीला ज्ञान मिळूच शकत नाही. लोकांची ज्ञानाची भूक भागविण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून केले जाते. ग्रंथमुळे व्यक्ती, समाज, वैचारिकदृष्ट्या सक्षम होतो. समाजातील वैचारिक दारिद्र्य दूर करण्याचे काम ग्रंथपाल, ग्रंथालये आणि ग्रंथ करतात. ज्ञानाविषयी पाश्र्चात्यांना अधिक प्रेम असल्याचे आढळून येत असल्याचे डॉ. कुंभार यांनी सांगितले.

ऑक्सफर्ड - केंब्रिज विद्यापीठाच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानशक्तीमुळे कधीही सूर्यास्त न होणारे साम्राज्य निर्माण होऊ शकले, ही बाब कदापि नाकारण्याजोगी नाही.ग्रंथांमुळे सामाजिक - आर्थिक क्रांती घडू शकली.निसर्ग मानवाला जीवन देतो, पण त्या जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी, ऊर्जा ग्रंथ देत असतात, ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. कितीही मोठे घर असू द्या, त्या घरात ग्रंथ नसतील तर त्या घराला शून्य किंमत असते, असे सांगून डॉ. कुंभार यांनी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे ग्रंथांच्या सहवासात वावरणारे नेते असल्याचे सांगितले.

सुसंस्कृत, संवेदनशील माणूस घडवण्याची ताकद फक्त ग्रंथात असते. सभ्य समाज, माणूस घडवायचा असेल तर ग्रंथ ही मूलभूत गरज असतात, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. समाजात वाढलेली दांभिकता संपली पाहिजे. अभिजात साहित्यप्रती रुची वाढली पाहिजे. मानवजातीच्या कल्याणासाठी - उत्कर्षांसाठी ग्रंथांचे योगदानमहत्वाचे असल्याचे डॉ. नागोराव कुंभार यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून दोन दिवस आयोजित केल्या गेलेल्या सर्व उपक्रमांची माहिती दिली. या ग्रंथोत्सवाच्या यशस्वीतेसाठी सहाय्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे त्यांनी आभार व्यक्त केले. वाचन संस्कृती वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित केल्या जाणाऱ्या या उपक्रमास भरघोस प्रतिसाद मिळाल्याबद्दल काटकर यांनी समाधानही व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शादूल शेख गुरुजी यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे तांत्रिक सहाय्यक सुधीर आचार्य यांनी केले.

## जि. प. अध्यक्षपदी भाजपच्या सौ. उषाताई पाटील उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे दयानंद सुरवसे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** त्रिशंकू अवस्थेत असलेल्या बहुचर्चित लातूर जिल्हा परिषदेवर अपेक्षेप्रमाणे महायुतीचा झेंडा फडकला. अध्यक्षपदी भाजपच्या सौ. उषाताई पाटील यांची तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) पक्षाचे दयानंद सुरवसे विजयी झाले.



५९ सदस्यांच्या लातूर जिल्हा परिषदेत बहुमतासाठी यावेळच्या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला ३० जागा जिंकता आल्या नाहीत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सर्वाधिक २५ जागा जिंकल्या. त्या खालोखाल भाजपने १८, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार १२ जागा जिंकल्या होत्या. राज्यात महायुती सत्तेत असल्याने लातूर जिल्हा परिषदेतही महायुतीचे सत्तेत येणार असा अंदाज वर्तवला जात होता. तो अंदाज आज खरा ठरला. सर्वसाधारण महिला गटासाठी आरक्षित असलेल्या अध्यक्षपदासाठी भाजपच्या सौ. उषाताई पाटील यांनी तर उपाध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीकडून दयानंद सुरवसे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. महाविकास आघाडीकडूनही दोन्ही पदासाठी अर्ज दाखल करण्यात आले होते. महायुतीचे दोन्ही उमेदवार प्रत्येकी ३४ मते मिळवून विजयी झाले.

नवनिर्वाचित अध्यक्ष - उपाध्यक्षांचे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेशआप्पा कराड, आ. संजय बनसोडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# शिरूर अनंतपाळ शहरातील कामांची चौकशी करावी

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. १६ मार्च :** शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या माध्यमातून शहरातील जनतेला कायमस्वरूपी स्वच्छ पाणी मिळावे यासाठी कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर असून या कामासाठी शहरातील सर्व रस्ते खोदकाम करून पाईप लाईन टाकणे व नागरिकांना नळ कनेक्शन देण्याचे काम चालू आहे.ही कायम स्वरुपी पाणी पुरवठा योजनेचे काम करण्यासाठी नगरपंचायत कार्यालय शिरूर अनंतपाळ च्या वतीने २०२४ मध्ये या कामाचे कार्यारंभ आदेश दिले असून पाणी पुरवठा योजनेचे हे काम प्रगतीपथावर असताना व हे काम पूर्ण करण्यासाठी शहरातील रस्ते खोदकाम करण्याचे माहित असताना देखील नगरपंचायत चे स्थापत्य अभियंता व लोकप्रतिनिधी यांनी संगनमताने पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी रस्ते खोदकाम होणार आहे हे माहीत असताना देखील मागील काळात



शहरात अनेक ठिकाणी सिमेंट काँक्रेट रस्ते,पेव्हर ब्लॉकचे व नाली बांधकाम करण्यात आले व आता पाणी पुरवठा योजनेच्या नावाखाली गेल्या एक ते दीड वर्षात केलेले रस्ते फोडण्याचे काम चालू आहे.जर रस्ते खोदकाम करून पाणी पुरवठा योजनेचे काम होणार आहे हे माहीत असताना देखील शासनाच्या निधीचा दुरुपयोग केला गेला असून हा संगनमताने केलेला भ्रष्टाचार आहे.

या सर्व कामात शासनाचा निधीची लूट केली गेली असून या सर्व लोकांवर योग्य ती कारवाई करुन शासकिय निधीचा लुट करणाऱ्या संबंधिताकडून वसूल करावी तसेच चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे लातूर जिल्हाधिकारी यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, नगरसेवक सुधीर लखनगावे,शहर कार्याध्यक्ष संदीप धुमाळे, जेष्ठ नागरिक गुरूनाथ अचवले यांनी केली आहे.

# रेल्वे मार्गाच्या कामांना गती द्या : खा. डॉ. काळगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी वर्षभरात सलग तिसऱ्यांदा नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांची भेट घेऊन लातूर रोड-जळकोट-मुखेड बोधन या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गाच्या कामास गती देण्याची मागणी केली आहे. या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे मार्गाच्या कमला गती देणे आवश्यक असल्याचे खा. डॉ. काळगे यांनी सांगितले.

लातूर रोड-जळकोट-मुखेड बोधन हा प्रस्तावित रेल्वे मार्ग अनेक वर्षांपासून प्रलंबित असून या मार्गामुळे नांदेड, लातूर आणि तेलंगणा राज्यातील सीमावर्ती भागातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. व्यापार, शेतीमालाची वाहतूक, तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी हा रेल्वे मार्ग अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे खा. डॉ. काळगे यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

सरकारकडून रेल्वे प्रकल्पाबाबत केंद्र सकारात्मक भूमिका असली तरी या प्रकल्पास मराठवाड्यातील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा रेल्वे मार्ग लवकरात लवकर मार्गी लागावा, यासाठी केंद्र सरकार तसेच महाराष्ट्र व तेलंगणा राज्य सरकारांनी समन्वय साधून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा या भागातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. लातूर रोड जळकोट मुखेड बोधन रेल्वे मार्गाचे काम सुरू झाल्यास मराठवाडा आणि तेलंगणा दरम्यान रेल्वे संपर्क वाढून या भागाच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मतही नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

या रेल्वे मार्गामुळे तेलंगाणामधील नागरीकांना श्री क्षेत्र पंढरपूर येथील देवस्थान, तुळजापूर, तसेच परळी येथील वैद्यनाथ देवस्थान हे जवळ येणार आहे. यासोबतच रामागुंडम येथून महाराष्ट्रातील औष्णिक विद्युत प्रकल्पास कोळसा जवळच्या मार्गाने उपलब्ध होणार आहे. यासोबतच विशाखापट्टनम व रत्नागिरी ही दोन बंदरे एकमेकाशी जोडली जाणार आहेत. त्यामुळे हा रेल्वे मार्ग अतिशय महत्वाचा आहे. यामुळेच केंद्र सरकारने हा मार्ग मंजूर केला होता. नीती आयोगाच्या अख्त्यारीत हा मार्ग आहे. या मार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. या कामास त्वरित गती देण्यात यावी असा आग्रह खा. डॉ. काळगे यांनी लावून धरला आहे.

## तातडीने रस्ता दुरुस्त करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** एम.आय.डी.सी. मधील लातूर - बार्शी रोड पासून हरंगुळ (बु.) गावात येणारा रस्ता अत्यंत नादुरुस्त झालेला आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्त करण्याची मागणी हरंगुळ चे माजी सरपंच तथा लोकाधिकार संघाचे लोकाधिकारप्रमुख व्यंकटराव पनाळे यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लातूर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

बार्शी रोड पासून कीर्ती मिल समोरून हरंगुळ (बु) गावात येणारा रस्ता अत्यंत नादुरुस्त झालेला असून या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडलेले आहेत. तसेच या रस्त्यावरून वाहन चालवणे म्हणजे एक प्रकारची कसरतच करावी लागत आहे. दि. २३ मार्च ते २ एप्रिल असा मंदार येथे भव्य असा हरिनाम सप्ताह होणार आहे. मंदार येथील हनूमान देवस्थानच्या प्रांगणात हनुमान मंदिराच्या शेजारीच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर बांधकाम करण्यात आलेले असून त्या मंदिरात श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्याबरोबरच या मंदिराचे कलशारोहण पण होणार आहे. या कार्यक्रमापूर्वी हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्यात यावा व या रस्त्यावरील काही पोल वरील बंद असलेले पथदिवे तातडीने चालू करण्यात यावेत, अशी मागणी व्यंकटराव पनाळे यांनी केली आहे.

## राहुल गांधी व काँग्रेस विरोधात भाजपचे तीव्र आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** देशाच्या संसदेचा अवमान केल्याचा आरोप करत राहुल गांधी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विरोधात भारतीय जनता पार्टी लातूर शहर जिल्ह्याच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वाखाली गांधी चौक येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान दिनांक १२ मार्च २०२६ रोजी संसदेच्या मकर प्रवेशद्वाराबाहेर काँग्रेसचे नेते राहुल गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी चहापार्टी आयोजित केली. या कृतीमुळे देशाच्या संसदेसह संपूर्ण जनतेचा अवमान झाल्याची भावना व्यक्त करत भाजपच्या वतीने या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला.



यावेळी मनपा गटनेते दिपक मठपती, जिल्हा सरचिटणीस संजय गीर, रागिणीताई यादव, नगरसेवक रविशंकर जाधव, स्वातीताई घोरपडे, करुणा शिंदे, अनंत गायकवाड, उद्धव तेलंगे, ऋषिकेश राजे, विनय जाकते, प्रमोद गुडे, पवन आल्टे, शितल मालू, सौ. सीमाताई करपे, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, ज्योतीराम चिवडे, मुन्ना हाश्मी, राहुल भुतडा, सुरेश जाधव, निर्मलाताई कांबळे, राजेश जाधव, धनंजय हाके, सुरेश राठोड, देवा गडदे, महादेव कानगुले, बाबा गायकवाड, विजय अवचारे, गजानन गंभीरे यांसह भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका महत्त्वाची : प्रा. डॉ. क्रांती मोरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात केवळ महाविद्यालय नाही तर त्यात पालकांची भूमिका महत्वाची आहे. शिक्षण म्हणजे केवळ पदव्या मिळवणे किंवा पुस्तकी ज्ञान आत्मसात करणे नव्हे, तर मुलांमधील कौशल्यांचा विकास करून त्यांना एक उत्तम माणूस म्हणून घडवणे ही काळाची गरज आहे. महाविद्यालयात विद्यार्थी केवळ सहा तास औपचारिक शिक्षण घेतो, मात्र उर्वरित वेळात अनौपचारिक शिक्षणातूनच खरा माणूस घडतो. यात पालकांची भूमिका सर्वात मोलाची आहे, असे परखड मत डॉ. क्रांती मोरे यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय एमआयडीसी लातूर येथे १२ वी विद्यार्थ्यांचा वासंतिक पालक मेळाव्या प्रसंगी प्रा डॉ. मोरे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मारुती सूर्यवंशी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य गोविंद शिंदे, उपप्राचार्य संजय अंकुश, उपप्राचार्य विठ्ठल चेवले, प्रा. वैजनाथ जाधव, प्रा. हणमंत बद्दे, प्रा निवृत्ती गौडगावे, प्रा. सुधाकर दर्शने, प्रा. विरेष स्वामी, प्रा. अंजली अकुसकर, प्रा. प्रशांत बेंडगे, प्रा. परमेश्र्वर भंगे, प्रा. सुरज सोनटक्के, शरद खंडागळे, संभाजी मोटे आदी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य शिंदे म्हणाले की, १२ वी चे वर्ष अत्यंत महत्वाचे असून पालकानी पाल्याच्या बाबतीत सकारात्मक दृष्कोन ठेवावा. सातत्य सराव व नियोजन केल्यास विद्यार्थी यशस्वी होतात. महाविद्यालयाने वार्षिक नियोजन केले आहे अनुभवी शिक्षक आहेत बोर्डाचा १०० टक्के निकाल आहे. नीट जेईई व सीईटीत परिक्षेत विद्यार्थीनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालय व पाल्य यांचा पालकानी समन्वय साधावा असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य सूर्यवंशी म्हणाले, पॉवर पॉइंट प्रेझेंटेंशनद्वारे महाविद्यालयाचे वर्षभराचे शैक्षणिक नियोजन सराव परिक्षा व बोर्ड तयारी नीट जेईई सीईटी व वाणीज्य शाखेचे सीए फौऊंडेशन कोर्स व कला शाखेच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षा नियोजन व तासीका बाबत चे सखोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राध्यापक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य मनोज गायकवाड यांनी केले. सुत्रसंचलन व आभार प्रा सुचीता घाडगे मानले.

# न्यायालयाच्या आदेशानंतर ७ जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** एका रियल इस्टेट व ट्रेडिंग कंपनीचा संस्थापक असल्याचे सांगून ज्ञानेश्वर कुरडे, विकास गरड, आश्विनी उर्फ रागिणी कुरडे यांनी ९१ लाख ७७ हजार ६०० रुपयांची फसवणूक केल्याची घटना दि. १९ ऑगस्ट २०२१ ते ३० जून २०२२ या कालावधीत घडली. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने अखेर १८ महिन्यानंतर सुरूवातीस टाळाटाळ करणाऱ्या लातूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एकनाथ अभिमन्यू दुडिले रा. गोविंद नगर हरंगुळ (बु.) ता. जि.लातूर हे एका खत औषधाच्या कंपनीत व प्लॉटिंग व्यवसायात काम करतात. त्यांची ओळख ज्ञानेश्वर कुरडे, विकास गरड व आश्विनी कुरडे यांच्यासोबत झाली. तुम्ही आमच्या कंपनीचे औषध विका असे सांगून ओळख वाढवली व ऑगस्ट २०२१ मध्ये त्याने स्वराज जीआरबी बद्दल माहिती सांगून या कंपनीसाठी, प्लॉटिंगची जमीन किंवा विक्रीसाठी प्लॉट बघा अशी विनंती केली. त्यांच्या ओळखीचे दत्तात्रय बोबडे, रा. रेल्वे गेट जवळ, कळंब रोड, वरवंटी येथे राहणार यांचे हरंगुळ बु. येथील गट नं. ७८ मधील रुद्रा बारच्या समोर प्लॉट क्र.२५, २६, २७, २८, २९ व ३० विक्री करणार असल्याचे सांगितले. मालकासोबत चर्चा करून सदर प्लॉट खरेदी करण्याची तयारी दाखवली व इसारापोटी तीन लाख मात्र व उर्वरित रक्कम दर महिना १ लाख ५० हजार देण्यात येईल असा ठराव झाला होता. व यांनी अंबाजोगाई येथील स्वराज ट्रेडिंग व स्वराज रियल इस्टेटमध्ये काम करण्यास सुरुवात केली. ही कंपनी विविध मार्गांनी पैशाची गुंतवणुक करुन ठेविदाराना १२० दिवसात दिडपट रक्कम देते असे सांगण्यात येत होते. सुरुवातील एकनाथ दुडिले यांनी याकडे दुर्लक्ष केले. परंतु ज्ञानेश्वर कुरडे, आश्विनी कुरडे व विकास गरड यांनी त्यांच्या घरी जाऊन सहकुटूंब येऊन पैसे गुंतवणीची विनंती केली. त्यामुळे त्यांनी ज्ञानेश्वर कुरडे याच्या खात्यावर पैसे गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. वर्षभरात सुमारे ९१ लाख ७७ हजार ६०० रुपये गुंतवणक करण्यात आली. त्यातील ३० लाख ७९ हजार ०९९ रुपये परत आले. त्यातील ६१ लाख १८ हजार ४०० रुपये रक्कम बाकी आहे. ती रक्कम परत देण्याची विनंती केली परंतु त्यांनी रक्कम देण्यास टाळाटाळ केला.

आता आपली रक्कम मिळत नाही याची खात्री झाल्याने एकनाथ अभिमन्यू दुडिले यांनी दि १० सप्टेंबर २०२३ रोजी फिर्याद देण्याचा प्रयत्न केला. पण फिर्याद घेतली नाही व न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. फिर्यादीने न्यायालयात धाव घेऊन अखेर न्यायालयाच्या आदेशाने दि ५ मार्च २०२६ अन्वये आरोपी ज्ञानेश्वर अभिमन्यू कुरडे, आश्विनी उर्फ रागिणी कुरडे, विकास गरड, गणेश राजाराम भिसे, पुजा गणेश भिसे दोघे, स्वराज जीआरबी इंडस्ट्रिज, ट्रेडींग, रियल इस्टेट या ७ जणाविरोधात अमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून आरोपीविरुध्द एमआयडीसी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नांदेडमध्ये घरगुती गॅसचा काळाबाजार उघड

# श्रीनगर भागातून १० सिलिंडर जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मार्च-**

घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरची अवैध साठवणूक करून चढ्या दराने विक्री करणाऱ्यांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्हा पुरवठा विभागाने श्रीनगर भागात धाड टाकून १० रिकामे गॅस सिलिंडर जप्त केले असून संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हनुमान मंदिर रोड, श्रीनगर परिसरात राहणारे मकसूद अहमद हे आपल्या राहत्या घरी घरगुती व व्यावसायिक गॅस सिलिंडरचा अवैध साठा करून चढ्या दराने विक्री करत असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड व तहसीलदार संजय वारकड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १२ मार्च २०२६रोजी संबंधित ठिकाणी आकस्मिक तपासणी केली.

तपासणीदरम्यान पथकाला एकूण १० रिकामे गॅस सिलिंडर आढळून आले. त्यामध्ये घरगुती वापराचे ७ सिलिंडर (एचपी-३, भारत गॅस-२, इंडेन-२) तर व्यावसायिक वापराचे ३ सिलिंडर (एचपी कंपनीचे) असे एकूण १० रिकामे सिलेंडर पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

या प्रकरणात जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ तसेच लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (Restriction on Use and Fixation of Selling Price) आदेश, २००० मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्याने निरीक्षण अधिकारी रवींद्र राठोड यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार संबंधित आरोपीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या कारवाईत निरीक्षण अधिकारी रवींद्र राठोड, मुंजाभाऊ लोकरे, बालाप्रसाद वल्लाकट्टी, वेदनेश्वर घावट (जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय) तसेच नवदीप जाधव आणि विश्वनाथ शिंदे यांनी विशेष मेहनत घेतली.


घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर किंवा अवैध साठवणूक करून सर्वसामान्यांची लूट करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड यांनी केले आहे.

## व्यवसायीकांनी घरगूती गॅस सिलेंडरचा वापर केल्यास कारवाई : तहसीलदार गूंडमवार

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १६ मार्च-**

व्यवसायीकांनी घरगूती गॅस सिलेंडरचा वापर करु नये, केल्यास कारवाई करण्याचा इशारा तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी दिला आहे.

तालूक्यातील मंगल कार्यालये, लॉन, केटरींग व्यवसायीक, हॉटेल मालक, बार अँड रेस्टोरेंट मालक, स्विट मार्ट, भोजनालये, टि कॉफी स्टॉल्स तसेच सर्व व्यवसायीकांनी घरगूती गॅसचा अवैध वापर सर्रासपणे सूरु असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून व्यवसायीकांनी घरगूती गॅसचा वापर करित असल्याने त्याचा परिणाम घरगूती गॅस पूरवठ्यावर होत आहे गॅस सिलेंडरची टंचाई निर्माण होत आहे.चौकशी दरम्यान तसे अढळून आल्यास सदर गॅस कनेक्शन रद्य करुन गॅस सिलेंडर जप्त करण्यात येईल व आत्यावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत कारवाई संबधित हॉटेल मालक केटरिंग व्यवसायीकांवर करण्यात येईल असे आवाहन तहसीलदार विनोद गूंडमवार, पूरवठा अधिकारी श्रीकांत आडेपवार यांनी केले आहे.आपल्या अस्थापना ठिकाणी



(१९.२ज्ञ.स.)वापर करणे बंधनकारक आहे.व्यवसायीक ठिकाणी घरगूती गॅसचा (१४.२ज्ञस)वापर करणे किंवा साठवणूक करणे नियमबाह्य असून कायद्याने गून्हा ठरतो. तरी व्यवसायीकांनी घरगूती वापराचा गॅस वापर केल्यास कारवाई करण्यात येईल असे आवाहन करण्यात आले.

## सिडकोत गुरुकृपा महिला मंडळाच्या वतीने श्रीमद् भागवत कथा

**नवीन नांदेड**-सिडको येथील ग्रुप करपा महिला मंडळाच्या वतीने प्रथमच श्रीमद् भागवत कथा व किर्न सोहळ्याचे आयोजन गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दिनांक १९ मार्च २०२६ रोज गुरुवारी भागवताचार्य अनिल महाराज माजलगावकर यांच्या उपस्थितीत सिद्धी अष्टविनायक गणपती मंदिर परिसर दत्तनगर सिडको येथे करण्याचे आयोजिले आहे. सिडको येथील गुरुकृपा महिला मंडळाच्या वतीने श्रीमद् भागवत कथा व कीर्तन सोहळ्याचे आयोजन दिनांक १९ मार्च ते २५ मार्च २०२६ पर्यंत करण्याचे आयोजिले आहे या कीर्तन सोहळ्याचे प्रमुख कीर्तनकार भागवताचार्य अनिल महाराज माजलगावकर असतील तर त्यांना तबल्याची साथ सांगत संतोष देशमुख आरगांची सात संघात विशाल कळकेकर तसेच ऑक्टो पॅडची सात संघात विजय कळकेकर हे देणार आहेत तेव्हा या कीर्तन सोहळ्या तील कार्यक्रमाची रूपरेषा खालील प्रमाणे असेल दिनांक १९ मार्च रोजी गुरुवारी दुपारी एक ते पाच वाजता मंगलचरण, अवतान, वर्णन, परीक्षित कथन , शुकआगमन, दिनांक २० मार्च रोज शुक्रवारी एक ते पाच सृष्टी उत्पत्ती, कपिलमुनी, सती चरित्र्य, ध्रुव अख्यन.तर शनिवार दिनांक २१ मार्च रोजी दुपारी एक ते पाच वाजता जडभरत अजामेळ ,नृरसिंह अवतार, गजेंद्र अख्यान रविवार दिनांक २२ मार्च रोजी दुपारी एक ते पाच वाजता वामन अवतार, सूर्यवंश(राम), चंद्रवंश (कृष्ण अवतार) सोमवार दिनांक २३ मार्च रोजी दुपारी एक ते पाच वाजता कृष्णलिला,गोवर्धन पर्वत, कंसवध, रासलिला, मंगळवार दिनांक २४ मार्च रोजी दुपारी एक ते पाच वाजता द्वारका चरित्र्य, देवाचे लग्न, रुक्मिणी गर्वहरण, सुदामा चरत्र, बुधवार दिनांक २५ मार्च दुपारी एक ते पाच वाजता यदुकुळा शाप, दत्तात्रय २४ गुरू उद्धव कृष्ण संवाद, गोकर्ण महात्म्य तसेच शेवटी दिनांक २६ मार्च रोजी सकाळी १० वाजल्यापासून काल्याचे किर्तन आणि महाप्रसादा होईल्. तेव्हा या कीर्तन सोहळ्यास परिसरातील भाविक भक्तांनी जास्तीच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गुरुकृपा महिला मंडळ सिडको यांनी केले आहे. सदरील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी सौ. नंदा काचावार, सौ.दाक्षयणी महाजन, सौ. प्रतिभा कुलकर्णी, सौ. विजया गोडघासे, सौ्. राधाबाई जोशी, श्रीमती गिरजाबाई तेलंग, विजया कंठाळे, सौ सिंधु बागडे, सौ.स्वाती मुक्कावार, सौ. शारदा डाकोरे, सौ शोभा देशमुख, सौ मंगला गुंडाळे, श्रीमती कविता कामन्ना, सौ. कलावती चव्हाण, सौ रेशम करडखेले या भक्तगण महिला परिश्रम घेत आहेत.



## अ.भा. ग्राहक पंचायतच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश मस्के

**नांदेड** -अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या नांदेड जिल्हा शाखेची नवीन जिल्हा कार्यकारिणी एका बैठकीमध्ये आज घोषित करण्यात आली. देवगिरी प्रांताचे प्रांताध्यक्ष डॉ. विलास मोरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत जिल्ह्यातील ग्राहक हक्क संरक्षणासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीत ग्राहक पंचायतच्या कार्याचा आढावा घेत आगामी काळात ग्राहक जनजागृती, मार्गदर्शन आणि कायदेशीर सहाय्य या माध्यमातून ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटनेने सक्रिय भूमिका बजावावी, असे मत व्यक्त करण्यात आले. ग्राहकांचे हक्क अबाधित राहावेत, बाजारपेठेतील गैरप्रकारांना आळा बसावा आणि सर्वसामान्य ग्राहकांना योग्य न्याय मिळावा यासाठी संघटनेची भूमिका अधिक बळकट करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. नांदेड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये प्रभाग नऊच्या नगरसेवकपदी निवडून आल्याबद्दल नगरसेविका सदिच्छा सोनी- पाटील यांचा डॉ विलास मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीत अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या नांदेड जिल्हा शाखेची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यानुसार रमेश मस्के यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून सदिच्छा सोनी पाटील आणि निलेश गादगे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संतोष कुलकर्णी यांची जिल्हा सचिवपदी, तर अनुजाताई डोईफोडे यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी शुभांगीताई पावडे यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच या कार्यकारणीमध्ये मुक्तेश्वरी देशमुख (महिला प्रमुख), प्रवीण कुलकर्णी (प्रचार व प्रसिद्धी प्रमुख), नीलिमा मिसाळ (पर्यावरण प्रमुख), धनश्री प्रवीण कुलकर्णी (जिल्हा रोजगार सृजन प्रमुख), ड. स्वाती कुलकर्णी (जिल्हा लीगल सेल प्रमुख), ड. विजय रानवळकर (जिल्हा लीगल सेल सहप्रमुख), प्रा. डॉ. भाग्यश्री कापरे (जिल्हा आयटी सेल प्रमुख) आणि रश्मीताई वडवळकर (ग्राहक मार्गदर्शन प्रमुख) यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. राम जाधव, उत्तम कुंटूरकर, विवेक पवार, जयंत वाकोडकर, गंगाधर मैलारे, आकाश काळे यांची निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यात ग्राहक हक्कांविषयी जनजागृती वाढविणे, ग्राहकांना मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि अन्यायकारक व्यापारी पद्धतींविरोधात संघटितपणे लढा उभारण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी सेलू येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सचिव गंगाधर कान्हेकर यांचीही उपस्थिती होती.

## जिल्ह्यात चार दिवसांसाठी यलो अलर्ट

**नांदेड** -प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी १६ मार्च रोजी सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १६ व १९ मार्च २०२६ या दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. १६ व १७ मार्च हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा व १८ ते १९ मार्च २०२६ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची , विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे.

## प्रा. सुरेश देवशेट्टे यांना पी.एचडी पदवी बहाल

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १६ मार्च-**

येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. सुरेश देवशेट्टे यांना पी.एचडी. ही पदवी बहाल केली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत प्रा. सुरेश देवशेट्टे यांनी इतिहास विषयातील लातूर जिल्ह्यातील लिंगायत समाजाचा इतिहास: एक अभ्यास. हा प्रबंध विद्यापीठात सादर केला. त्यांना मार्गदर्शक म्हणून डॉ. एस बी दंदे यांचे मार्गदर्शन लाभले.



त्यांना विद्यापीठाने पी.एचडी ही पदवी बहाल केल्यामुळे त्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिने एस.बी.व कर्मचारी यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांना आध्यात्मिक मानवंदना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मार्च-**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने ज्ञानियांचा राजा मोगरा फुलला हा विशेष आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम बुधवार, दि. १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०६.३० वाजता कुसुम सभागृह, व्ही.आय.पी. रोड, नांदेड येथे संपन्न होणार आहे.

संत ज्ञानेश्वर माऊली यांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) या महान ग्रंथाद्वारे अध्यात्म, समता, प्रेमभाव आणि मानवतेचा संदेश सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवला. त्यांच्या विचारांनी महाराष्ट्रातील वारी परंपरा, संत साहित्य आणि समाजातील ऐक्यभाव अधिक दृढ केला आहे. त्यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित हा कार्यक्रम संत परंपरेच्या स्मरणार्थ तसेच अध्यात्मिक विचारांच्या प्रसारासाठी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे.

# मनपाच्या स्थायी समिती सदस्यांची निवड



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मार्च-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समिती, शिक्षण, महिला व बालकल्याण समिती तसेच स्विकृत नगरसेवकांची निवड जाहीर करण्यात आली.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आज महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत स्थायी समिती सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली असून, यात भारतीय जनता पार्टीचे विरेंद्रसिंघ गाडीवाले, सदाशिव पुरी, आशिष नेरलकर, सुमित मुथा, अभिषेक सौद्दे, तुळजाराम यादव, दिपाली मोरे, कविता गड्डम, सरिता बिरकले, निलम यादव तसेच एमआयएमचे शिफा तरन्नुम अब्दुल रऊफ, बेबी शाहिस्ता महंमद सलमान खान तर लोकन्याय विकास आघाडीचे परविन बेगम शेख पाशा, सुनिता जोंधळे, राहुल सोनसळे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे पूर्व प्राथमिक, माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली. यात भाजपाच्या सदिच्छा पाटील, निरंजना लांडगे, अमृता ठाकूर, संध्या देमगुंडे, सुलोचना काकडे, मनप्रितकौर कुंजीवाले, निलम यादव तसेच एमआयएमच्या अश्विनी धोंगडे, अलकेसरी सुमय्या गुलअफशा तर लोकन्याय विकास आघाडीच्या आफीया नाज काझी नाफे, राजश्री गोडबोले यांचा समावेश आहे.

त्याचबरोबर आज झालेल्या बैठकीत मनपाच्या स्विकृत सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली. यात भाजपाकडून अमितसिंह तेहरा, दिलीप कंदकुर्ते, आशुतोष जोशी, डॉ.अंकुश देवसरकर, सुप्रिया पाटील यांच्यासह वंचित-काँग्रेस आघाडीचे शेख बिलाल शेख रसुल, अब्बास हुसेन रजब अली, मोहंमद नासेर अहेमद महंमद इकबाल यांचा समावेश आहे.

# इस्लापूर येथील दुकानांना भीषण आग; पाच दुकाने आगीत जळून खाक

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १६ मार्च-**

इस्लापूर येथील मुख्य चौक परिसरात भीषण आगीची घटना घडली आहे. या आगीत पाच दुकाने जळून खाक झाली आहेत. ही आग रात्रीच्या ११:३० च्या सुमारास लागली या आगीत हार्डवेअर,हॉटेल, आईस फॅक्टरी ,चप्पल दुकान आणि मोबाईल शॉपी अशी पाच दुकाने जळून खाक झाली आहेत

या आगीचे कारण शॉर्टसर्किट मुळे झाल्याचे नागरिकांन मधून कळते आग विझवण्यासाठी येथील तरुणांनी शर्तीची प्रयत्न केले परंतु आगीने रौद्र रूप धारण केल्या मुळे



येथील युवक आग विझवन्यात अपयशी ठरले. काही वेळातच अग्निशामक दलाच्या हिमायतनगर व किनवट येथील दोन गाड्या घटना स्थळावर पोहोचल्या अग्निशामक दलाकडून शर्तीची प्रयत्न करीत ही आग विझवण्यात यश आले आहे. या आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही मात्र पाचही दुकाने आगीत जळून खाक झाली आहेत. यावेळी इस्लापूर पोलीस ठाण्याचे एपीआय उमेश भोसले यांनी चोख बंदोबस्त ठेवत नागरिकांना आगीपासून दूर ठेवले.

# पुस्तकामुळेच माणूस घडतो : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मार्च-**

माणसांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याची ताकद पुस्तक वाचनात असते. कायदे किंवा नियमांच्या आधारे बदल घडवता येत नाहीत; ते स्वयंप्रेरणेनेच घडतात. त्यामुळे वाचनाची सवय प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

नांदेड ग्रंथोत्सव २०२५ च्या समारोप प्रसंगी (दि. १५ मार्च) ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अच्युत बन होते. व्यासपीठावर माजी जि.प. अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा कोषागार अधिकारी विक्रम देशमुख, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, प्रकाशक निर्मलकुमार सूर्यवंशी, ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, निरीक्षक प्रताप सूर्यवंशी, राजेंद्र हंबीरे, गोविंद वडगावकर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले की, मला लहानपणापासून वाचनाची सवय आहे. पुस्तकावर केलेली गुंतवणूक आयुष्यात खूप काही देऊन जाते. लेखक आपल्या लेखनातून एकाच वेळी हजारो लोकांशी संवाद साधतात. आपण सर्व भाषांतील पुस्तके वाचली पाहिजेत. मराठी भाषेला मोठा साहित्यिक वारसा लाभला आहे. मोबाईलच्या युगात वाचन करणे म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासारखे आहे; मात्र हे आव्हान स्वीकारणे गरजेचे आहे.

कामाच्या व्यापातूनही वाचनाची सवय कायम ठेवत असल्याचे सांगत त्यांनी सेतुमाधव पगडी लिखित आणि कै. नरहर कुरुंदकर यांच्या प्रस्तावनेचे 'छत्रपती शिवाजी' हे पुस्तक सध्या वाचत असल्याचे सांगितले. तसेच या कार्यक्रमाला शासकीय सोपस्कार म्हणून नव्हे तर एक वाचक व ग्रंथप्रेमी म्हणून उपस्थित असल्याचेही त्यांनी नमूद केले. वाचन चळवळ वाढवणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तके देऊन वाचनाची गोडी लावावी, असे मत व्यक्त केले. माजी जि.प. अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे यांनी ग्रंथालयीन कर्मचारी अत्यंत कमी मानधनावर काम करत असून त्यांचे मानधन वाढविण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच ग्रंथालय क्षेत्रातील अडचणी सोडविण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे व राजेंद्र हंबीरे यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष डॉ. अच्युत बन यांनी मराठी भाषेचा वापर वाढविण्याचे आवाहन करत 'बन साहित्य प्रतिष्ठान'च्या वतीने गेल्या पंचवीस वर्षांपासून साहित्यिक पुरस्कार देण्यात येत असल्याची माहिती दिली. वाचनाच्या आवडीमुळे जागतिक साहित्य संमेलन व इतर कार्यक्रमांसाठी आतापर्यंत ५५ देशांना भेट दिल्याचेही त्यांनी सांगितले.

## अवैध गुटखा वाहतूकीवर देगलूर पोलिसांची कारवाई, पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मार्च-**

देगलूर पोलिसांनी अवैधरित्या होत असलेली गुटख्याची वाहतूक पकडून पाच लाख पाच हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई दि.१५ मार्च रोजी सावरगाव थडी गावाजवळील नईआबादी पॉइंटवर केली.

सावरगाव थडी गावाजवळील मेदनकलुर नईआबादीकडे जाणाऱ्या मार्गावरुन अवैधरित्या गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन देगलूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने घटनास्थळी जावून पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप एमएच-२६-बीई-१५१० हि संशयितरित्या आढळून आल्याने पोलिसांनी हे वाहन थांबवून गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये सागर पानमसाला, विमल पान मसाला, सुगंधीत तंबाखू एकूण पाच हजार ८५० व बोलेरो पिकअप वाहन पाच लाख असा एकूण पाच लाख पाच हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक अप्पाराव व्यंकट राठोड याच्याविरुध्द देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई पोलीस निरीक्षक मारोती मुंढे, पोलीस उपनिरीक्षक महाजन मैसनवाड, पोहेकॉ. चंद्रकांत भाग्यवंत, किरणकुमार वाघमारे, वैजनाथ मोटरगे, श्रीनिवास चिंदमवार, राजवंतसिंघ बुंगई, मल्लू राजमोड यांच्या पथकाने केली.

## काशी-वाराणशी, संत हवा मल्लीनाथ यांच्या सानिध्यात स्वातंत्र्यविर अमर बलिदान दिन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ मार्च-**

देशाच्या स्वांतत्र्यसाठी आपले अमूल्य जीवनाची बलिदान दिलेली महान स्वांतत्र्यवीर भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांचा अमर बलिदान दिन कार्यक्रम २३ मार्च २५ रोजी होणार असून जय भारत माता सेवा समितीच्या राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्यसानिध्यात यंदा काशी (वाराणशी) येथे आयोजित केले आहेत. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली यावेळी रमेश पारशेवार,दासराव हंबर्डे यांनी दिली.

जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात





आले असून विविध जिल्ह्यातून रेल्वे, जीप, क्लोजर सह विविध वाहनातून सुमारे एक लाख पेक्षा अधिक देशभक्त उपस्थित राहण्या बाबत नियोजन केले असून लातूर जिल्ह्यातील उदगीर मार्ग नांदेड जिल्ह्यातील नांदेड तालुक्यातील गुंडेगाव येथे १९ मार्च रोजी आगमन होणार आहे. विशेष म्हणजे क्रांतिकारी शहीद स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात देशातील सर्व राज्यातील देश भक्त एकत्रित येवून वेगवेगळ्या राज्यामध्ये गेल्या सात वर्षापासून अमर बलिदान कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. या पूर्वी बंगलोर, दिल्ली, पंजाब येथील भगतसिंग यांचे गांव खटकर कलान येथे, तसेच भारत-पाकिस्तान सीमेवर हुसैनीवाला या गांवी करण्यात आले असून अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्य नगरीत तसेच गेल्या वर्षी तामिळनाडू राज्यातील रामेश्वर येथे अमर बलिदान दिन कार्यक्रम आयोजित केले होते. यंदा मात्र काशी (वाराणशी) येथे आयोजन करण्यात आले आहे.

# बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा मध्ये नांदेड जिल्ह्याला मिळणार पहिल्यांदाच प्रतिनिधित्व

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ मार्च-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणूक २०२६ जाहीर झालेली असून येणाऱ्या २४ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण होणार आहे. राज्यभरातील वकील बंधू,भगिनींच्या न्याय हक्कासाठी ही परिषद कार्य करत आलेली आहे. वर्तमानस्थितीत संपूर्ण राज्यातून ०५ महिला,१८ पुरुष अश्या एकूण २३ जागांसाठी १५५ उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले असून,पात्र उमेदवारांची अंतिम सूची अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली आहे. मराठवाड्याच्या पूर्व भागातील नांदेड जिल्ह्यातून एकच उमेदवार पात्र ठरलेला असल्याने नांदेड जिल्ह्यातील वकील बांधवांची एकजूट दाखविण्याची वेळ आलेली आहे. कारण आपला हक्काचा माणूस निवडून देण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे.

नांदेड जिल्ह्यातून उमेदवारी अर्ज दाखल करत पात्र ठरलेले अनुक्रमांक ६३ - ऍड.नितीन लक्ष्मणराव कागणे हे मृदू,स्मितभाषी,मनमिळावू व माजी जिल्हा सहाय्यक सरकारी वकील व माजी जिल्हा सचिव असून प्रशासकीय व वकील बांधवांच्या समस्यांचा दांडगा अभ्यास असल्याने निश्चितच वकील बांधवांच्या पाठीशी सक्षमपणे खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणून अनेकवेळेला समोर आलेले आहेत. यावेळी जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ विधिज्ञ बांधवांनी तर पूर्णतः पाठिंबा जाहीर करत स्वतः हिरिरीने सहभाग नोंदवत निवडणूक प्रचारात आपल्या जिल्ह्यातील व्यक्तीला निवडून आणण्याबाबत ठाम भूमिका निभावलेली दिसत आहे. नांदेड जिल्ह्यातून जास्तीत जास्त मतदान झाले तर निश्चितच आपल्या जिल्ह्याला योग्य स्थान मिळेल आणि आपला माणूस बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाच्या सदस्य रूपाने भविष्यात काम करण्यासाठी सज्ज होईल,असे मत नांदेड जिल्ह्यातील जिल्हा सत्र न्यायालय,अतिरिक्त सत्र न्यायालय,कौटुंबिक न्यायालय,कामगार न्यायालय,धर्मादाय आयुक्त व सर्व तालुकास्तरीय न्यायालयातील सर्व वकील बंधू,भगिनी यांनी व्यक्त केले आहे.